





# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २१४ * नांदेड * बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# नांदेड जिल्ह्यातील ४४ उमेदवारांना तीन वर्षांसाठी निवडणूक लढवण्यास बंदी

- निवडणूक खर्चाच्या हिशोबाचे प्रकरण
- जिल्ह्यातील पहिलीच मोठी कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील नुकत्याच झालेल्या १२ नगरपरिषदा आणि एका नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक २०२५ मध्ये पार पडली होती. या निवडणुकीत उमेदवारांनी केलेल्या खर्चाचा हिशोब विहित कालावधीत आणि विहित पद्धतीने सादर करणे बंधनकारक होते. मात्र, हा हिशोब विहित मुदतीत सादर न करणाऱ्या नांदेड जिल्ह्यातील ४४ उमेदवारांना ३ वर्षांसाठी पुढील कोणत्याही निवडणुकांसाठी अपात्र ठरविण्यात आले आहे. अशा पद्धतीची कारवाई ही जिल्ह्यातील पहिली असल्याचे सांगण्यात आले.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १६(१ड) अन्वये ही कारवाई करण्यात आली आहे. याबतचे आदेश दि. २७ जुलै २०२६ रोजी निर्गमित करण्यात आले असून, संबंधित उमेदवारांची नावे दि. ५ ऑगस्ट २०२६ च्या शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहेत.

अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांमध्ये हिमायतनगर नगरपंचायत – १४ उमेदवार अपात्र, किनवट नगरपरिषद– ७ उमेदवार, उमरी नगरपरिषद– ६ उमेदवार, धर्माबाद नगरपरिषद – ६ उमेदवार, कंधार नगरपरिषद– ५ उमेदवार, मुखेड नगरपरिषद– ३ उमेदवार, भोकर नगरपरिषद– २ उमेदवार आणि लोहा नगरपरिषद– १ उमेदवार असे एकूण ४४ उमेदवार पुढील तीन वर्षांसाठी कुठल्याही निवडणुकीसाठी अपात्र करण्यात आले आहेत.

**जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा दणका**

नुकत्यात झालेल्या नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीमध्ये जिल्ह्यातील ४४ उमेदवारांनी विहित काळात आपला निवडणूक खर्च निवडणूक विभागाकडे सादर केला नाही. हे चौकशीत निष्पन्न झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी निवडणूक विभागाच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील ४४ उमेदवारांना पुढील तीन वर्षासाठी कुठलीही निवडणूक लढता येणार नाही असा निर्णय दिल्याने जिल्ह्यात राजकीय गोटात खळबळ उडाली आहे.

# मनपाच्या सर्वसाधारण सभेत सत्ताधारी-विरोधक आमनेसामने

- घोषणाबाजी, सभात्याग अन् प्रश्नांचा भडिमार
- काही नगरसेवकांना बोलू न दिल्यामुळे गोंधळ
- आरोग्य प्रश्नावर नगरसेवकांनी प्रशासनाला धारेवर धरले
- शिक्षण विभाग मात्र अजूनही दुर्लक्षितच



**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत मंगळवारी विविध नागरी प्रश्नांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य व्यवस्था, भू-संपादन, कंत्राटी कर्मचारी, पशुवैद्यकीय सेवा आणि विकासकामांच्या प्रश्नांवर नगरसेवकांनी प्रशासनाला जाब विचारला. सभेच्या सुरुवातीलाच विरोधकांनी आक्रमक भूमिका घेत घोषणाबाजी केली आणि अखेर काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या नगरसेवकांनी सभात्याग करत निषेध नोंदवला. गोंधळ घालणाऱ्या वंचित आणि काँग्रेसच्या सदस्यांची महापौर कविता मुळे यांनी चांगलीच कान उघाडणी केली.

महापौर कविता संतोष मुळे यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपमहापौर दीपक सिंह रावत, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आणि नगरसचिव अजितपालसिंग संधू यांची उपस्थिती होती.

शहरातील रस्त्यांची दुरवस्था, पाणीपुरवठ्यातील अनियमितता, कचरा व्यवस्थापन आणि रखडलेल्या विकासकामांवरून विरोधकांनी प्रशासनाला धारेवर धरले. 'प्रशासनाचा निषेध असो', 'नागरिकांच्या समस्या सोडवा, नाहीतर खुर्च्या खाली करा' अशा घोषणांनी सभागृह दणाणून गेले. वंचित बहुजन आघाडीचे प्रशांत इंगोले यांच्यासह नगरसेवकांनी सभात्याग केला. काँग्रेसचे नगरसेवक अब्दुल गफार, सत्यपाल सावंत, मुन्ना अब्बास व त्यांच्या सहकाऱ्यांनी बहिष्कार नोंदवत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. सत्ताधाऱ्यांनी मात्र विरोधकांचा हा प्रकार राजकीय स्टंट असल्याचा पलटवार केला.




सभागृहातील कामकाजादरम्यान काही महिला नगरसेविकांना त्यांच्या प्रभागातील प्रश्न मांडण्यासाठी पुरेशी संधी मिळाली नसल्याची नगरसेविका मीनल पाटील, दिपाली कल्याणकर यांची नाराजीही पुढे आली. राष्ट्रगीत झाल्यानंतर काही महिला नगरसेविकांनी याबाबत तीव्र संताप व्यक्त केला. लोकप्रतिनिधींना सभागृहात आपल्या मतदारसंघातील प्रश्न मांडण्याचा समान अधिकार मिळायला हवा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान, पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर नवीन जलवाहिन्या सुरू करण्यासाठी नागरिकांकडून अर्ज **(पान ३ वर...)**

# अन्नात भेसळ दिसताच थेट मोक्का, एकनाथ शिंदेंचा थेट आदेश

**मुंबई (प्रतिनिधी)–** गेल्या काही काळापासून राज्यातील अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडून भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणात येत आहे. तुकाराम मुंढे यांची एफडीएच्या आयुक्त पदाची सुत्रे स्वीकारल्यापासून आस्थापनांवर कारवाई कडक कारवाई केली जात आहे. अशातच आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एफडीएच्या अधिकाऱ्यांना भेसळ करणाऱ्यांविरोधात मोक्का अंतर्गत कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

समोर आलेल्या माहितीनुसार, दूध पनीरसह अन्न भेसळखोरांवर संघटित गुन्हेगारी अंतर्गत कारवाई करावी अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एफडीएच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी आणि विशेषतः लहान मुलांच्या जीवाशी खेळणाऱ्या दूध, दुग्धजन्य पदार्थ भेसळखोरांवर संघटित गुन्हेगारी अंतर्गत गुन्हा दाखल करा असं एकनाथ शिंदे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सादरीकरणादरम्यान दिल्या आहेत.

# शिवसेनेवर निकाल देण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नव्हताच!

## ठाकरेंचे वकील कपिल सिब्बलांचा जोरदार युक्तीवाद

**मुंबई (प्रतिनिधी)–** शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावरून ठाकरे आणि शिंदे गटात सुरू असलेल्या कायदेशीर लढाईची सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचे ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी सुनावणीदरम्यान निवडणूक आयोगाच्या निर्णयावर आणि अधिकारक्षेत्रावर अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले.

विधिमंडळ पक्षातील फूट ही राजकीय पक्षातील फूट मानता येते का, २०१८ ची पक्षघटना अमान्य करण्याचा आयोगाला अधिकार होता का, तसेच 'मुख्य नेता' हे पद शिंदे यांनी कोणत्या आधारे स्वीकारले, असे अनेक मुद्दे




सिब्बल यांनी न्यायालयासमोर मांडले.

पुढे कपिल सिब्बल म्हणाले की, कपिल सिब्बल यांच्या युक्तिवादाचा मुख्य आधार हाच होता की, एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर फूट ही विधिमंडळ गटात पडली होती, राजकीय पक्षात नाही. त्यामुळे विधिमंडळ पक्षातील फूट म्हणजेच संपूर्ण शिवसेना पक्षात फूट पडली, असा निष्कर्ष निवडणूक आयोगाने काढणे चुकीचे असल्याचा दावा त्यांनी केला.

विधिमंडळ पक्षाची स्वतंत्र बैठक घेणे किंवा विधिमंडळ शाखेशी संबंधित पत्रव्यवहार करणे याचा अर्थ राजकीय पक्षात फूट पडली असा होत नाही, असे सिब्बल यांनी स्पष्ट केले. २१ जूनच्या पत्राचा संबंध केवळ विधिमंडळ शाखेशी होता, असा त्यांचा युक्तिवाद होता.

सिब्बल यांच्या मते, परिच्छेद १५ अंतर्गत निवडणूक आयोगाचे अधिकार तेव्हाच वापरता येतात जेव्हा राजकीय पक्षात फूट पडते आणि दोन प्रतिस्पर्धी गट निर्माण होतात. केवळ विधिमंडळ पक्षात फूट पडल्याचे दाखवून आयोगाला हा अधिकार वापरता येणार नाही, असेही त्यांनी न्यायालयासमोर मांडले.

# अरुणाचल आमचा भाग होता आणि राहिल, सत्य बदलणार नाही; चीनला भारताचा स्पष्ट संदेश

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अरुणाचल प्रदेशातील २७ जागा आणि खास जागांना भारताच्या अधिकृत नकाशावर त्याच्या मानका नावांसह प्रसिद्धी देण्याच्या भारताच्या पावलाने चीन संतापला आहे. सोमवारी चीनने यावर नाराजी व्यक्त केल्यानंतर नवी दिल्लीने यावर स्पष्ट शब्दांत अरुणाचल प्रदेश आमचा भाग आहे आणि राहिल अशा शब्दांत सुनावले आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने मंगळवारी पुन्हा स्पष्ट केले की, अरुणाचल भारताचा अभिन्न अंग आहे आणि हे सत्य कोणी बदलू शकत नाही. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जायसवाल यांना चीनच्या आक्षेपाबद्दल विचारले असता ते म्हणाले की अरुणाचल भारताचे एक अतुट आणि अभिन्न अंग आहे. हे सत्य इतके स्वच्छ आहे की यास कोणी बदलू शकत नाही.

चीनने अरुणाचल प्रदेशातील काही ठिकाणांची नावे वारंवार बदलल्यानंतर, भारताने गेल्या आठवड्यात राज्यातील २७ ठिकाणे आणि महत्त्वाच्या स्थळांना भारताच्या अधिकृत नकाशावर त्यांच्या प्रमाणित नावांसह अधिकृतपणे जाहीर केले होते. त्यावेळी एका अधिकृत निवेदनात सरकारने म्हटले होते, 'अरुणाचल प्रदेशच्या भारतीय सर्वेक्षण विभागाच्या नकाशावर या महत्त्वाच्या स्थळांना औपचारिकपणे घोषीत करण्याचा उद्देश त्यांची अचूक ओळख आणि लोकांमध्ये अधिक चांगली जागरूकता निर्माण करणे हा आहे.

# टँकरच्या चाकाखाली चिरडून वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू

**लोहा (प्रतिनिधी)–** नांदेड रस्त्यावरील शासकीय विश्रामगृहासमोरील पेट्रोल पंपासमोर नांदेडकडे जाणाऱ्या दुधाने भरलेल्या टँकरचा अपघात झाला. या टँकरच्या मागील चाकाखाली येऊन एका ६९ वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. ही घटना मंगळवार, दि. ११ ऑगस्ट रोजी सकाळी सात वाजताच्या सुमारास घडली. पोलिसांनी टँकर चालकासह ताब्यात घेतला.

लोहा शहरातील सायाळ रोड भागातील रहिवाशी भागीरथाबाई रामदास पुदिंगे (वय ६९) ही वृद्ध महिला सकाळी सात वाजताच्या दरम्यान घरून निघून नांदेड रस्त्याने पायी जात होती. यावेळी शासकीय विश्रामगृहासमोरील पेट्रोल पंपासमोर लोह्याकडून नांदेडकडे भरधाव वेगात जाणाऱ्या दुधाने भरलेला टँकर क्र. टी.एस. ०८ यू.एल. ०१७१ च्या पाठीमागील चाकाखाली भागीरथाबाई आल्याने चिरडून त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघात एवढा भीषण होता की, त्यांच्या शरीराच्या खालील भाग चेंदामेंदा झाल्याने रस्त्यावर रक्त मासाचा सडा पडला होता. घटनेची माहिती मिळताच लोहा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन स्थानिक नागरिकांच्या मदतीने प्रेत उत्तरीय तपासणीसाठी लोहा उपजिल्हा रुग्णालयात हलविले. पोलिसांनी अपघातग्रस्त टँकर चालकासह ताब्यात घेतला. याप्रकरणी लोहा पोलिसांत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होती.

# नांदेडमध्ये आज 'हर घर तिरंगा' अभियानाचा भव्य जागर

## महानगरपालिकेच्यावतीने हजारो शालेय विद्यार्थ्यांची अभूतपूर्व 'तिरंगा रॅली'

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात ९ ते १७ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा अभियान उत्साहात राबविण्यात येत आहे. या अभियानाचा भाग म्हणून आणि राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'च्या १५० व्या वर्षानिमित्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या वतीने उद्या, १२ ऑगस्ट रोजी सकाळी ठीक ८:३० वाजता शहरातील शालेय विद्यार्थ्यांची एक भव्य 'तिरंगा रॅली' आयोजित करण्यात आली आहे.

या रॅलीचे उद्घाटन महापौर कविता संतोष मुळे यांच्या हस्ते आणि मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत हिरवी झेंडी दाखवून करण्यात येणार आहे.

### मनपा आयुक्तांचे आवाहन –आयुक्त डॉ. डोईफोडे

तिरंगा हा आपल्या देशाचा स्वाभिमान आहे. या रॅलीच्या माध्यमातून आपण नव्या पिढीमध्ये राष्ट्रभक्तीचे आणि देशसेवेचे संस्कार रुजवत आहोत. त्यामुळे नांदेडमधील सर्व व्यापारी, तरुण, महिला आणि नागरिकांनी आज सकाळी या रॅलीमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले आहे.

रॅलीची सुरुवात सकाळी ८:३० वाजता, तिरंगा ध्वज परिसर, शासकीय तंत्रनिकेतन चौक शहरातील व्ही.आय.पी. रोड– आय.टी.आय. कॉर्नर– शिवाजीनगर– कलामंदिर– वजिराबाद चौक– महावीर चौक मार्गे जाऊन समारोप महात्मा गांधी पुतळा येथे होणार आहे.


या देशप्रेमाच्या महाउत्सवात नांदेड शहरातील महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा, तसेच खासगी व अनुदानित शाळांमधील हजारो विद्यार्थी, एनसीसी कॅडेट्स, स्काऊट गाईड पथक आणि शिक्षक पूर्ण गणवेशात सहभागी होणार आहेत.

# उद्योग विभागाचे नांदेडचे उपविभागीय कार्यालय बंद

## उद्योग संचालनालयाचे उद्योग आयुक्तालय असे नामकरण

**नांदेड (प्रतिनिधी)–** उद्योग संचालनालयाचे नामकरण आता उद्योग आयुक्तालय असे करण्यात आले आहे. तसेच नांदेड येथील उपविभागीय कार्यालय बंद करण्यात आले असून, या कार्यालयाचे सर्व कामकाज सह आयुक्त (उद्योग व सेवा), छत्रपती संभाजीनगर विभाग, विकास भवन, दुसरा मजला, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडे वर्ग करण्यात आले आहे.

यापुढे नांदेड येथील उपविभागीय कार्यालयाशी संबंधित पत्रव्यवहार व कामकाजासाठी संबंधितांनी छत्रपती संभाजीनगर येथील सह आयुक्त (उद्योग व सेवा) यांच्या कार्यालयाशी दूरध्वनी क्र. (०२४०) २३३११०५ किंवा ई–मेल : diro aurangabad maharashtra.gov.in यावर संपर्क साधावा. यापुढे अधिक्षकीय उद्योग अधिकारी, उपविभागीय कार्यालय, नांदेड या कार्यालयास करावयाच्या पत्रव्यवहाराबाबत झालेल्या या बदलाची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे सहाय्यक आयुक्त (उद्योग व सेवा) अमोल इंगळे यांनी केले आहे.






# पंतप्रधान मोदींचे 'हर घर तिरंगा' अभियानात सहभागी होण्याचे आवाहन

**मुंबई (प्रतिनिधी)–** भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन अवघ्या काही दिवसांवर आला असून देशभरात त्याची तयारी सुरू झाली आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना 'हर घर तिरंगा २०२६' अभियानात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. मंगळवारी सोशल मीडियावर व्हिडिओ संदेश शेअर करत त्यांनी नागरिकांना स्वातंत्र्यदिन अभिमानाने आणि उत्साहाने साजरा करण्याचे आवाहन केले.

पंतप्रधान मोदी यांनी स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहण्याचे आवाहन केले. तसेच विकसित भारताचे ध्येय पुढे नेण्यासाठी नागरिकांनी संकल्प घेण्याचेही त्यांनी सांगितले. प्रत्येक घरावर तिरंगा फडकवून स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन करत त्यांनी आपला संदेश पूर्ण केला.

भारत सरकारकडून यंदा 'हर घर तिरंगा २०२६' अभियान ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्टदरम्यान राबवले जात आहे. या मोहिमेचा उद्देश नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना वाढवणे आणि राष्ट्रध्वजाबद्दल आदर निर्माण करणे हा आहे. या काळात नागरिकांना आपल्या घरावर तिरंगा फडकवण्यास किंवा सन्मानपूर्वक प्रदर्शित करण्यास प्रोत्साहित केले जात आहे.

या अभियानात नागरिक डिजिटल पद्धतीनेही सहभागी होऊ शकतात. तिरंग्यासोबतचा फोटो ऑनलाइन शेअर करून मोहिमेत सहभाग नोंदवता येतो. तसेच तिरंग्यासोबतचा फोटो अपलोड केल्यानंतर डिजिटल प्रमाणपत्र मिळवण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

दरम्यान, मंगळवारी सकाळी संसद ग्रंथालय भवनात एनडीएच्या साप्ताहिक संसदीय पक्षाच्या बैठकीपूर्वी तिरंगा फडकवण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजप अध्यक्ष नितीन नवीन यांच्यासह एनडीएच्या नेत्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी 'वंदे मातरम्'च्या घोषणांनी परिसरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले.

# बारडमध्ये बिबट्याचा धुमाकूळ; ५ शेळ्या ठार

**मुदखेड (प्रतिनिधी)–** मुदखेड तालुक्यातील बारड येथील लहुजी नगर परिसरात बिबट्याने मध्यरात्री धुमाकूळ घालत एका शेतकऱ्याच्या पाच शेळ्यांवर हल्ला करून त्यांना ठार केल्याची घटना ९ ऑगस्टच्या मध्यरात्री घडली. या हल्ल्यामुळे परिसरात प्रचंड घबराट पसरली आहे.

बारड येथील लहुजी नगर भागातील गरीब शेतकरी माणिक नारायण कांबळे यांनी आपल्या घरासमोर पाच शेळ्या बांधल्या होत्या. ९ ऑगस्टच्या मध्यरात्री सुमारास दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक या शेळ्यांवर हल्ला चढवला. या दुर्दैवी घटनेत पाचही शेळ्यांचा जागीच मृत्यू झाला. आजच्या महागाईच्या काळात शेळ्यांचा बळी गेल्याने कांबळे यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. घटना घडल्याचे समजताच सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब बारडकर यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांनी या घटनेची माहिती वन विभाग व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना दिली. अधिकाऱ्यांनी त्वरित घटनास्थळी येऊन पंचनामा करावा आणि पीडित शेतकरी माणिक कांबळे यांना शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी जोरदार मागणी बारडकर यांनी केली आहे.

**परिसरात बिबट्याची दहशत; शेतकरी चिंतेत**

मुदखेड तालुक्यातील बारड, निवघा, डोंगरगाव, पार्डी आणि वैजापूर या परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. शेतात किंवा आखाड्यावर बांधलेली जनावरे, वासरे आणि पाळीव कुत्र्यांवर बिबट्यांचे हल्ले होण्याच्या घटना वारंवार घडत आहेत.

बिबट्याच्या वाढत्या दहशतीमुळे शेतकरी आणि ग्रामस्थ प्रचंड चिंतेत आहेत. बिबट्याच्या भीतीपोटी शेतात किंवा आखाड्यावर राखणीसाठी 'सालगडी' (शेतमजूर) राहण्यास तयार नाहीत. त्यामुळे वन विभागाने या बिबट्यांचा तातडीने बंदोबस्त करून त्यांना पकडून मोठ्या जंगलात सोडावे, अशी उद्विग्न मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# बाटली आडवी, पण हिंसा सुरूच!

दारूबंदी हा शब्द उच्चारला की, त्यामागे सामाजिक सुधारणेची एक मोठी कल्पना उभी राहते. दारूच्या व्यसनामुळे उद्ध्वस्त होणारी कुटुंबे, हिंसाचाराला बळी पडणाऱ्या महिला आणि व्यसनाच्या विळख्यात अडकणारे तरुण यांना वाचवण्यासाठी सरकारने कठोर निर्णय घेतला, असे चित्र उभे केले जाते. गावातील अनेक महिला एकत्र येऊन गावाबाहेर असलेले दारू उत्पादन केंद्र उद्ध्वस्त केल्याची उदाहरणे आपण पाहतो, परंतु यामुळे त्या गावातील महिलांवर होणारे अन्याय-अत्याचार थांबलेत का? बिहारमध्ये एप्रिल २०१६ मध्ये लागू झालेली दारूबंदीही याच आशावादातून आली. महिलांच्या सुरक्षिततेला या निर्णयाच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आले. मात्र, जवळपास दशकभरानंतर आलेल्या नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्चच्या अभ्यासाने या धोरणाच्या परिणामकारकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. हा प्रश्न केवळ बिहारचा नसून संपूर्ण देशामध्ये समान प्रमाणात आहे. दारूबंदीमुळे महिलांविरुद्धच्या हिंसाचारात अपेक्षित घट झाल्याचे ठोस पुरावे उपलब्ध नसल्याचे अहवालातील निरीक्षण महत्त्वाचे आहे. उलट, दारूबंदीच्या कालखंडात महिलांविरुद्ध नोंदविले जाणारे गुन्हे कमी झालेले दिसत नाहीत. हा निष्कर्ष केवळ बिहार सरकारसाठीच नव्हे, तर 'बंदी हाच सर्व समस्यांवरील उपाय' या मानसिकतेसाठीही धडा आहे. याचा अर्थ दारूबंदी करू नये असा होत नाही तर महिलांवरील होणाऱ्या अन्यायामागे असणाऱ्या सर्व कारणांचा अभ्यास केला गेला पाहिजे व त्यानुसार उपाययोजना केली गेली पाहिजे. दारूचे दुकान बंद करणे आणि दारूचे सेवन बंद करणे यात जमीन-अस्मानाचा फरक आहे. कायद्याने विक्रीवर निर्बंध आणता येतात; परंतु व्यसनाची मागणी एका आदेशाने संपत नाही. अधिकृत बाजारपेठ बंद झाल्यानंतर अवैध दारूचा व्यापार आणि तस्करीचे जाळे सक्रिय राहिल्याचे अहवालातून स्पष्ट होते. परिणामी, सरकारच्या नियंत्रणाबाहेरचा बाजार फोफावला असेल तर त्यातून गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराला खतपाणी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. असाच प्रकार गुटखा बंदी बाबत झालेला आहे. गुटक्यावर बंदी आणल्यानंतर त्याची विक्री आणि सेवन याचे प्रमाण वाढल्याचे दिसते. यात सर्वांत मोठी विसंगती अशी की, दारूबंदीचा प्रमुख सामाजिक उद्देश महिलांना हिंसेपासून संरक्षण देणे हा होता. जर तो उद्देशच अपेक्षित प्रमाणात साध्य होत नसेल, तर धोरणाच्या परिणामांचे वस्तुनिष्ठ पुनर्मूल्यांकन करण्याची वेळ आली आहे. दारूबंदीचा राजकीय अभिमान आणि तिचे सामाजिक परिणाम यांची गल्लत करता कामा नये. या धोरणाची आर्थिक बाजूही दुर्लक्षित करता येणार नाही. दारूबंदीपूर्वी उत्पादन शुल्क हा बिहारच्या महसुलाचा महत्त्वाचा स्रोत होता. अहवालानुसार त्याचा वाटा सुमारे १४ टक्के होता. दारूबंदीमुळे हा महसूल गमावला गेला; त्याच वेळी तस्करी रोखण्यासाठी आणि कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारी यंत्रणेवर अतिरिक्त आर्थिक भार पडला. म्हणजे महसुलाचा स्रोत बंद आणि नियंत्रणाचा खर्च सुरू, अशी स्थिति निर्माण झाली. तथापि, केवळ महसूल वाढवण्यासाठी दारूची विक्री खुली करावी, हा निष्कर्षही घाईचा ठरेल. दारूमुळे होणारे आरोग्यविषयक आणि सामाजिक नुकसान लक्षात घेता सरकारने महसुलाच्या पलीकडे जाऊन व्यापक सार्वजनिक हिताचा विचार करणे आवश्यक आहे. पण एखादे धोरण सामाजिक हितासाठी आहे असे म्हणणे आणि ते प्रत्यक्षात सामाजिक हित साधते आहे हे सिद्ध करणे, या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. दारूबंदीच्या चर्चेत त्यामुळे 'बंदी विरुद्ध मुभा' एवढाच पर्याय ठेवणे चुकीचे ठरेल. नियंत्रित विक्री, कठोर नियमन, व्यसनमुक्ती केंद्रांचा विस्तार, जनजागृती, अल्पवयीनांना विक्रीवरील कठोर कारवाई आणि महिलांविरुद्धच्या हिंसाचारावर तातडीने न्याय देणारी यंत्रणा, या सर्वांचा एकत्रित विचार करावा लागेल. कोणत्याही राज्याच्या विकासासाठी शिक्षण, आरोग्य, शासन व कायदा-सुव्यवस्था, पूरनियंत्रण, खासगी क्षेत्राचा विकास आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. विशेषतः महिला सक्षमीकरणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक असला पाहिजे. महिलेच्या हातातील आर्थिक स्वावलंबन, शिक्षण, रोजगार, सुरक्षित सार्वजनिक वातावरण आणि प्रभावी कायदेशीर संरक्षण ही तिच्या सुरक्षिततेची खरी साधने आहेत. दारूबंदीचा निर्णय मागे घेणे म्हणजे सरकारचा पराभव आणि तो कायम ठेवणे म्हणजे विजय, अशी सोपी राजकीय गणिते आता उपयोगाची नाहीत. सरकारने स्वतःच्या धोरणाचीही त्याच कठोरपणे तपासणी केली पाहिजे, ज्या कठोरतेने ते नागरिकांकडून कायद्याचे पालन अपेक्षित करते. बिहारचा अनुभव एक सार्वत्रिक प्रश्न उपस्थित करतो की, सामाजिक समस्या कायद्याच्या बंदीने सुटतात की समाजाच्या बदलाने? दारूबंदीचा प्रयोग जर महिलांची सुरक्षितता वाढवण्यात अपुरा ठरत असेल, अवैध बाजाराला आळा घालण्यात अपयशी ठरत असेल आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेवर अतिरिक्त भार टाकत असेल, तर त्यातील त्रुटी मान्य करून पुढील धोरण आखणे हेच जबाबदार शासनाचे लक्षण ठरेल. म्हणूनच, दारूची बाटली बंद करण्यापेक्षा दारूमुळे आणि इतर कारणांमुळे निर्माण होणाऱ्या हिंसेची कारणे बंद करणे अधिक कठीण आहे. त्यासाठी कायदा हवा, पण त्याहून अधिक हवा तो सक्षम प्रशासनाचा, सामाजिक प्रबोधनाचा आणि महिलांच्या आर्थिक-सामाजिक सक्षमीकरणाचा.

# युवाशक्ती : राष्ट्रनिर्मितीची प्रेरणाशक्ती!

दरवर्षी १२ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो.ज्यांच्या डोळ्यांत स्वप्नं असतात, ज्यांच्या मनात जिद्द असते आणि ज्यांच्या हातात परिवर्तन घडवण्याची ताकद असते, ते म्हणजे युवा! युवा ही केवळ वयाची अवस्था नाही, तर ऊर्जा, उत्साह, कल्पकता, धाडस आणि परिवर्तनाची शक्ती आहे. कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचा वेग हा त्या देशातील युवांच्या विचारांवर, कर्तृत्वावर आणि दृष्टिकोनावर अवलंबून असतो. आजचा युवा केवळ उद्याचा नागरिक नाही, तर आजच्या राष्ट्रनिर्मितीचा सक्रिय शिल्पकार आहे.

ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा, उद्योग, सामाजिक सेवा आणि राष्ट्रसेवा अशा प्रत्येक क्षेत्रात युवा आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. त्यांच्या स्वप्नांना योग्य दिशा, कौशल्यांना योग्य संधी आणि प्रयत्नांना योग्य व्यासपीठ मिळाले, तर हीच युवाशक्ती देशाला प्रगतीच्या नव्या उंचीवर घेऊन जाऊ शकते. म्हणूनच युवाशक्ती : राष्ट्रनिर्मितीची प्रेरणाशक्ती! हा केवळ एक विषय नाही, तर नव्या आणि सक्षम राष्ट्राच्या निर्मितीचा संकल्प आहे.

**युवा घडला, तर भविष्य घडेल**
**युवा जागा झाला, तर राष्ट्र जागे होईल!**

ज्या राष्ट्राची युवा पिढी जागरूक, कर्तृत्ववान आणि ध्येयवादी असते, त्या राष्ट्राचे भविष्य निश्चितच उज्ज्वल असते.युवा हा कोणत्याही राष्ट्राचा ऊर्जास्रोत आणि परिवर्तनाची शक्ती असतो. तरुणांमध्ये उत्साह, जिद्द, कल्पकता आणि नवीन काहीतरी करण्याची क्षमता असते. त्यांच्या नव्या विचारांमुळे समाजात सकारात्मक बदल घडवून आणता येतो.

आजचे युवा शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा, उद्योग आणि सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देत आहेत. अडचणींना न घाबरता त्यांचे संधीत रूपांतर करण्याची ताकद युवांमध्ये आहे. त्यामुळे युवांना योग्य शिक्षण, कौशल्य आणि संधी मिळणे आवश्यक आहे.



युवाशक्तीला योग्य दिशा मिळाली, तर राष्ट्राच्या प्रगतीला नवी गती मिळते. म्हणूनच युवा म्हणजे केवळ देशाचे भविष्य नाही, तर राष्ट्रनिर्मितीची वर्तमानातील प्रेरणाशक्ती आहे. शिक्षण हे सक्षम आणि आत्मनिर्भर युवा घडवण्याचे महत्त्वाचे साधन आहे. आधुनिक काळात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून तंत्रज्ञान, डिजिटल कौशल्ये, उद्योजकता आणि व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. योग्य शिक्षण आणि कौशल्यांच्या बळावर युवा रोजगाराच्या संधी निर्माण करू शकतात आणि देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात युवांची नवीन विचार करण्याची आणि नवनिर्मिती करण्याची क्षमता देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. नवीन कल्पना, संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून युवा अनेक समस्यांवर प्रभावी उपाय शोधू शकतात. स्टार्टअप, डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या क्षेत्रांत युवांचे योगदान देशाच्या विकासाला नवी दिशा देत आहे. समाजातील समस्या ओळखून त्यावर सर्जनशील आणि नाविन्यपूर्ण उपाय शोधणे, हीच खरी युवा शक्ती आहे. योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास युवा देशाला तंत्रज्ञान आणि नवकल्पनांच्या क्षेत्रात पुढे नेऊ शकतात.

राष्ट्राच्या आर्थिक विकासात युवांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. युवा केवळ नोकरी शोधणारे न राहता रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनणे आवश्यक आहे. लघुउद्योग, स्टार्टअप आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून युवा स्वतःच्या पायावर उभे राहू शकतात आणि इतरांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊ शकतात. उद्योजकतेमुळे आर्थिक विकासाला चालना मिळते आणि युवांमध्ये आत्मविश्वास, स्वावलंबन व नेतृत्वगुण विकसित होतात. योग्य कौशल्य, मेहनत आणि नाविन्यपूर्ण विचारांच्या बळावर युवा देशाच्या अर्थव्यवस्थेला मजबूत करू शकतात.

समाजाच्या प्रगतीमध्ये युवांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. युवा हे समाजातील जागरूकता आणि परिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनू शकतात. अंधश्रद्धा, भेदभाव, व्यसनाधीनता, भ्रष्टाचार आणि अस्वच्छता यांसारख्या सामाजिक समस्यांविरोधात जनजागृती करून सकारात्मक बदल घडवून आणणे ही युवांची जबाबदारी आहे. रक्तदान, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन युवा समाजाच्या विकासात योगदान देऊ शकतात. सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून प्रत्येकाने आपल्या कर्तव्याची सुरुवात स्वतःपासून केली, तर एक सुदृढ, स्वच्छ आणि आदर्श समाज निर्माण होऊ शकतो.

राष्ट्राच्या विकासात युवांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. जागरूक, जबाबदार आणि कर्तव्यनिष्ठ युवा हे मजबूत लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. मतदानाचा हक्क बजावणे, सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होणे आणि सार्वजनिक प्रश्नांवर जागरूकपणे मत मांडणे यामुळे लोकशाही अधिक सक्षम होते. देशासमोरील समस्या समजून घेऊन त्यावर सकारात्मक उपाय शोधणे आणि समाजाच्या विकासासाठी पुढाकार घेणे ही युवांची जबाबदारी आहे. युवा केवळ देशाच्या प्रगतीचे प्रेक्षक न राहता सक्रिय भागीदार झाले, तर राष्ट्रनिर्मितीला नवी दिशा आणि गती मिळू शकते.

पर्यावरणाचे रक्षण करणे ही आजच्या काळातील सर्वांचीच जबाबदारी आहे. हवामान बदल, प्रदूषण, पाण्याची कमतरता आणि वाढती वृक्षतोड ही भविष्यासाठी गंभीर आव्हाने आहेत. या समस्यांवर मात करण्यासाठी युवांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.

वृक्षारोपण, जलसंधारण, प्लास्टिक-मुक्ती, कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत जीवनशैलीचा स्वीकार यांसारख्या उपक्रमांमध्ये युवा पुढाकार घेऊ शकतात. स्वतः पर्यावरणपूरक सवयी अंगीकारून इतरांमध्येही जनजागृती निर्माण केली, तर पर्यावरण संवर्धनाला मोठी चालना मिळू शकते. राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात तरुणींचा समान आणि सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. शिक्षण, रोजगार, नेतृत्व, विज्ञान, तंत्रज्ञान आणि उद्योजकता अशा प्रत्येक क्षेत्रात तरुणींना समान संधी मिळणे आवश्यक आहे. सक्षम आणि आत्मविश्वासू तरुणी आपल्या कुटुंबासोबतच समाजाच्या आणि राष्ट्राच्या प्रगतीतही महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. महिला युवांना योग्य शिक्षण, कौशल्य, सुरक्षित वातावरण आणि नेतृत्वाच्या संधी दिल्यास त्यांच्यातील क्षमता अधिक प्रभावीपणे विकसित होईल. स्त्री-पुरुष समान सहभागातूनच सर्वांगीण आणि सक्षम राष्ट्राची निर्मिती शक्य आहे.

राष्ट्राच्या प्रगतीसाठी सक्षम आणि सकारात्मक विचार करणारे युवा नेतृत्व अत्यंत आवश्यक आहे. नेतृत्व म्हणजे केवळ एखादे पद मिळवणे नव्हे, तर जबाबदारी स्वीकारून इतरांना योग्य दिशा देणे होय. आत्मविश्वास, शिस्त, प्रामाणिकपणा, निर्णयक्षमता आणि टीमवर्क हे प्रभावी नेतृत्वाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत.

युवांनी प्रत्येक परिस्थितीकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे आणि अडचणींना संधी मानणे आवश्यक आहे. अपयशाला घाबरून न जाता त्यातून शिकून पुन्हा प्रयत्न करण्याची वृत्ती यशस्वी नेतृत्व घडवते. सकारात्मक विचार आणि मजबूत नेतृत्वगुणांच्या बळावर युवा स्वतःचे तसेच समाजाचे भविष्य अधिक उज्ज्वल करू शकतात. आजची युवा पिढी म्हणजे उद्याच्या राष्ट्राचे शिल्पकार. कोणत्याही देशाचे भविष्य त्या देशातील युवांच्या विचारांवर, शिक्षणावर, कौशल्यांवर आणि कर्तृत्वावर अवलंबून असते. आजचे युवा उद्याचे शास्त्रज्ञ, उद्योजक, शिक्षक, प्रशासक, सैनिक, समाजसेवक आणि नेतृत्वकर्ते आहेत. त्यामुळे राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी युवांना सक्षम आणि जबाबदार बनवणे अत्यंत आवश्यक आहे.

युवांच्या हातात नवीन तंत्रज्ञान, विज्ञान, संशोधन आणि नवकल्पनांची ताकद आहे. शिक्षण आणि कौशल्यांच्या माध्यमातून ते देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी चालना देऊ शकतात. तसेच उद्योजकता, रोजगारनिर्मिती, सामाजिक सेवा आणि पर्यावरण संवर्धन यांसारख्या क्षेत्रांत सक्रिय सहभाग घेऊन ते राष्ट्राच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात. मात्र केवळ ज्ञान आणि कौशल्य पुरेसे नाही. युवांमध्ये प्रामाणिकपणा, शिस्त, कर्तव्यभावना, सामाजिक जाणीव, सहकार्याची वृत्ती आणि राष्ट्रप्रेम यांसारखे मूल्यही रुजणे आवश्यक आहे. योग्य संस्कार आणि सकारात्मक विचार असलेली युवा पिढीच देशाच्या विकासाला योग्य दिशा देऊ शकते. युवांना योग्य शिक्षण, कौशल्यविकास, मार्गदर्शन आणि संधी उपलब्ध करून देणे ही कुटुंब, शाळा, समाज आणि शासनाची सामूहिक जबाबदारी आहे. युवांच्या क्षमतेवर विश्वास ठेवून त्यांना पुढे जाण्यास प्रोत्साहन दिल्यास देशाचे भविष्य अधिक सक्षम आणि उज्ज्वल होईल. युवांच्या हातात केवळ देशाचे वर्तमान नाही, तर देशाचे भविष्यही आहे. त्यांच्या विचारांना दिशा, स्वप्नांना संधी आणि कर्तृत्वाला व्यासपीठ मिळाले, तर युवाशक्ती निश्चितच राष्ट्रशक्तीत परिवर्तित होईल.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९७६७८३०४९८

# भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार विक्रम साराभाई

भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि आधुनिक भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे महान संशोधक विक्रम साराभाई यांची उद्या म्हणजे १२ ऑगस्ट रोजी जयंती. अंतराळात भरारी मारणारा भारत असे आपण म्हणतो. एकवेळ सुई ही बनवू न शकणारा आपला भारत आज विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण बनला आहे. अंतराळ विज्ञान क्षेत्रात तर भारताने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

अंतराळ विज्ञान क्षेत्रात भारत जागतिक महासत्ता बनत आहे याचे सर्व श्रेय विक्रम साराभाई यांनाच जाते. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध उद्योगपती होते त्यामुळे देशातील मोठ्या नेत्यांचे त्यांच्या घरी उठबस असायची. त्यांच्या वडीलांनाही विक्रम साराभाई यांनी राजकारणात यावे किंवा उद्योगपती बनावे असे वाटत होते पण नियतीच्या मनात वेगळेच होते. विक्रम साराभाई यांना गणित आणि विज्ञान विषयाची खूप आवड होती. १२ वि नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी ते विदेशात गेले. केंब्रिज विद्यापीठात त्यांनी विज्ञान शाखेत प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या विक्रम साराभाई यांनी अल्पावधीतच विज्ञान शाखेची पदवी पूर्ण केली. भारतात आल्यावर त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये नोबेल पुरस्कार विजेते सर सी व्ही रमण यांच्या मार्गदर्शनाखाली कोस्मिक किरणांवर संशोधन केले.

१९४२ साली त्यांनी प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिक आज मल्लिका हे दोन अपत्य झाली. १९४५ साली ते



ब्रिटनला गेले तिथे त्यांनी इन्वेस्टीगेशन इन ट्रॉपिकल लॅटिट्युडवर संशोधन करून पीएचडी मिळवली. ११ नोव्हेंबर १९४७ ला अहमदाबादला त्यांनी फिजिकल रिसर्च लॅबरोटरीची स्थापना केली. केरळ जवळील थुंबा हे ठिकाण लाँच पॅड साठी निश्चित करण्यात आले कारण हे ठिकाण मॅग्नेटिक इक्वेटर लाईन (चुंबकीय भूमध्य रेखा) च्या अगदी जवळ होते पण त्याठिकाणी काही घरे होती तसेच एक चर्चही होते त्यामुळे तेथील लोक तेथून हटण्यास तयार नव्हते भौगोलिक आणि वैज्ञानिक कारणामुळे ही जागा खूप महत्वाची होती पण तेथील लोक ती जागा देण्यास तयार नव्हते शेवटी विक्रम साराभाई यांनी त्या लोकांची भेट घेतली त्या जागेचे महत्व त्यांना समजावून सांगितले. विक्रम साराभाई यांच्यामुळे ती जागा सरकारला देण्यास लोक तयार झाले.

भारत सरकारने त्याठिकाणी थुंबा रॉकेट लाँचिंग स्टेशनची स्थापना केली. २१ नोव्हेंबर १९६५ ला तिथून पहिल्या रॉकेटचे प्रेक्षपण करण्यात आले ते यशस्वी झाले. विक्रम साराभाई यांच्यामुळे हे शक्य झाले म्हणून भारत सरकारने या स्टेशनचे विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे नामांतर केले. विक्रम साराभाई स्पेस सेंटर तर उभारले गेले पण तिथे तज्ज्ञ संशोधकांचा तुटवडा भासू लागला. देशातील तरुण संशोधक विदेशात सेवा बजावत होते. विक्रम साराभाई यांनी त्यांना भारतात परतण्याचे आवाहण केले. त्यांनी या संशोधकांना सांगितले की देशाचे बजेट कमी असल्याने आम्ही तुम्हाला परदेशात आहेत त्याप्रमाणे वातानुकूलित प्रयोगशाळा आणि ऑफिस देऊ शकणार नाही, पण टेबल खुर्ची आणि एक कपाट नक्की देऊ.

भारत मातेच्या सेवेसाठी तुम्ही देशात परत या. त्यांच्या आवाहनाला अनेक संशोधकांनी प्रतिसाद दिला. वसंत गोवरीकरांसारखे महान शास्त्रज्ञ त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन भारतात परतले. त्यांनी तज्ज्ञ सांशीधकांची एक टीम बनवली त्यांच्या नेतृत्वाखालील या टीमने विमानाचे, अंतरिक्ष यानाचे ( रॉकेट) उड्डाण यशस्वी व्हावे यासाठी जीवाचे रान केले. दिवस रात्र मेहनत केली. त्यांच्या या अविश्रांत मेहनतीचे फळ म्हणजे 'आर्यभट्ट' हा भारताचा पहिला उपग्रह अंतराळात झेपावला. अंतराळ क्षेत्रात भारताने पहिले यशस्वी पाऊल टाकले. डॉ विक्रम साराभाई यांच्या अथक प्रयत्नांमुळेच भारतीय अवकाश संशोधन संस्थेची (इसरो) ची स्थापना झाली. आयआयएम अहमदाबाद च्या स्थापनेतही त्यांचे मोलाचे योगदान आहे. १९६६ साली डॉ होमी जहांगीर भाभा यांच्या निधनानंतर ते परमाणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष बनले. अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांची अध्यक्षपदे त्यांनी भूषवली. अवकाश संशोधनासोबतच टेक्सटाईल, फार्मासिटीकल, अणुऊर्जा, कला या क्षेत्रातही त्यांनी विशेष कामगिरी केली. आज भारत अंतराळ विज्ञान क्षेत्रात स्वयंपूर्ण आहे यामागे विक्रम साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे. डॉ अब्दुल कलाम यांनीही आपल्या अग्निपंख या आत्मचरित्रात विक्रम साराभाई यांच्या नेतृत्व गुणाचे कौतूक केले आहे.

डॉ. अब्दुल कलाम विक्रम साराभाई यांच्या विषयी म्हणतात, 'ते स्वप्न पहायचे आणि ते प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मेहनतही घ्यायचे. त्यांचे व्यक्तिमत्व आणि कार्य त्यांच्या सहकाऱ्यांसाठी नेहमीच प्रेरणास्रोत ठरले आहे. त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांना वेगळी दृष्टी दिली. विक्रम साराभाई हे भारतीय अंतराळ युगाचे शिल्पकार आहेत.' त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण व पद्मविभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरविले आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी झटणाऱ्या या महान संशोधकाचे ३० डिसेंबर १९७१ साली थुंबा येथेच हृदयविकाराने निधन झाले. विक्रम साराभाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# अपेक्षामुक्त जीवन चिंतामुक्तीचा मार्ग



आयुष्य सुंदर आणि समाधानाने जगायचे असेल तर माणसाने कोणत्याही गोष्टीसाठी कुणाकडून कसलीही अपेक्षा करू नये. अपेक्षा नसेल तर मनाविरुद्ध घडले काय आणि मनासारखे घडले काय? काहीही फरक पडणार नाही. अपेक्षा नसतील तर अपेक्षाभंग होण्याचा प्रश्नच येत नाही. अपेक्षाभंग झाला नाही तर त्रास होणार नाही. त्रास झाला नाही तर चिंता वाटणार नाही. चिंता वाटणार नाही तर दुःख होणार नाही आणि दुःखच नसेल तर आपल्यासारखा समाधानी माणूस कुणीच नाही. म्हणून आपण अपेक्षामुक्त राहण्याचा नेहमीच प्रयत्न केला पाहिजे. कारण आपल्या आयुष्यातील अनेक समस्यांचे मुख्य कारण या अपेक्षाच असतात...

आजकाल आपण स्वतःवर कमी आणि दुसऱ्या व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवतो. आपल्याला असे वाटते की, आपली समस्या, आपल्या अडचणी, आपल्या अपेक्षा कुणी पूर्ण करू शकत असेल तर ती आपली समोरची व्यक्ती. त्यामुळे आपण नेहमी समोरच्याकडून आधार शोधत असतो. त्यामुळे साहजिकच त्या व्यक्तीकडून आपल्या अपेक्षा वाढतात आणि इथेच आयुष्याचा लोचा होतो. कारण जशी माणसे अचानकपणे येतात तशी अचानकपणे सोडून जातातही. त्यामुळे बऱ्याचदा आपल्या अपेक्षा पूर्ण होऊ शकत नाही. तेव्हा आपण चिंताग्रस्त होतो. पुढे त्याचा परिणाम आपल्या संपूर्ण आयुष्यावर व्हायला लागतो...

आज संपूर्ण जग प्रचंड वेगाने बदलत आहे. त्यामुळे आपल्या जीवनशैलीमध्येही प्रचंड वेगाने दररोज अनपेक्षित बदल घडताहेत. हे बदल सहजा-सहजी आपण स्वीकारण्यास तयार नसतो. कारण हे बदल बऱ्याचदा आपल्या मनाविरुद्ध असतात. मनाविरुद्ध गोष्टी घडायला लागल्या की ताणतणाव, चिंतेचे प्रमाण वाढायला लागते. कारण प्रत्येक व्यक्ती आपल्या प्रत्येक अपेक्षा पूर्ण करू शकतोच असे नाही. म्हणून आयुष्यात जे घडत आहे ते घडू द्यावे, त्यांना फारसे मनाला लावून घेऊ नये, कसलीही अपेक्षा ठेऊ नये, कोणत्याही गोष्टीचा अति प्रमाणात विचारही करू नये. कारण काही गोष्टी सोडून दिल्या की, त्रास होत नाही.

फांदीवर बसलेल्या पाखराला फांदी मजबूत असायलाच पाहिजे याची कधीच अपेक्षा नसते. त्यामुळे फांदी अचानकपणे तुटली तरीही त्याला फारसा फरक पडत नाही. कारण त्याला त्याच्या पंखावर विश्वास असतो. अगदी तसाच जर आपला स्वतःवर पूर्ण विश्वास असेल तर आयुष्यातील कितीही अपेक्षा अपूर्ण राहिल्या तरीही उत्साहाने, हिंमतीने आपण पुढे जाऊ आणि आयुष्यामध्ये येणाऱ्या बऱ्या वाईट दिवसाचा, अचानकपणे आलेल्या चढ-उताराचा यशस्वीपणे सामना करू शकतो. शेवटी आयुष्याचा हिशोब ही मनासारखा लावता येतो. अट एवढीच की, आयुष्याच्या प्रवासात आपल्याला आपल्या अपेक्षांना ब्रेक लावता आला पाहिजे. कारण अपेक्षा वाढल्या तर चिंताही वाढतात.

**-सुरज पी. दहागावकर**
चंद्रपूर
मो. ८६९८६१५८४८

# अमेरिकेत साजरा होतोय, 'इंडिया डे'!

अमेरिकेतील मॅसॅच्युसेटस राज्यात आणि बोस्टन शहरात १५ ऑगस्ट हा दिवस अधिकृतपणे 'इंडिया डे' म्हणून साजरा केला जात आहे. भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मॅसॅच्युसेटसच्या गव्हर्नर मेरॉहिली आणि बोस्टन शहराच्या महापौर मिशेल वू यांनी ही अधिकृत घोषणा गतवर्षी १३ ऑगस्टला केली होती. मॅचॅच्युसेटस हे अमेरिकेच्या ५० राज्यांपैकी एक राज्य होय व बोस्टन हे अमेरिकेतील प्रमुख शहर आहे.

अमेरिकेतील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक केंद्र म्हणून बोस्टन शहराची ओळख संपूर्ण जगभरात आहे. अमेरिकेच्या प्रगतीत भारतीय नागरिकांचे मोठे योगदान आहे. या योगदानाचा एक मोठा गौरव म्हणून 'इंडिया डे' साजरा होत आहे. बोस्टनमध्ये साजरा होणाऱ्या 'इंडिया डे' चे विशेष आकर्षण आणि राजनीतिक महत्त्वाच्या दृष्टीने खास आहे. बोस्टनमध्ये भारताचे नवीन वाणिज्यता दूतावतावास सुरू होत असून, या ऐतिहासिक घोषणेशी त्याचा थेट मिलाप झाला आहे. भारतीय नौदलाचे प्रशिक्षण जहाज 'आयएनएस-सुदर्शन' हे बोस्टन शहरात दाखल झाले असून, तेथील सेलबोस्टन महोत्सवात भारताच्या समुद्र सागरी वर्षाचे प्रतिनिधीत्व करीत आहे.

याशिवाय फेडरेशन ऑफ इंडियन्स-अमेरिका (एफटी ए) न्यू इंग्लंडच्या वतीने ९ ऑगस्ट रोजी बोस्टन शहरात पाचवा भव्य इंटरनॅशनल 'इंडिया डे' परेडचे आयोजन करण्यात आले आहे. ख्रिस्तोफर कोलंबस पार्कमधून निघणाऱ्या या परेडमध्ये पंधरापेक्षा जास्त भारतीय संस्कृतीचे प्रदर्शन करणारे भव्यचित्र रथ, पारंपरिक नृत्य, भारतीय खाद्य संस्कृतीच्या उत्सवासोबत भारत-अमेरिका मैत्रीचे गौरव करणारे कार्यक्रम व ध्वजारोहण सोहळा संपन्न होईल.अशा प्रकारचा सोहळा यापूर्वी न्यूयॉर्क, कॅलिफोर्निया आणि टेक्सास शहरात सुद्धा संपन्न झाला आहे. अमेरिकेत पन्नास लाखांपेक्षा जास्त भारतीय वंशाचे लोक राहतात. जे तिथल्या अर्थव्यवस्थेला आणि संस्कृतीला समृद्ध करीत आहे. याशिवाय अमेरिकेतील वैद्यकीय, विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, व्यवसाय आणि सार्वजनिक सेवा क्षेत्रात भारतीयांचे उल्लेखनीय योगदान आहे. भारतीय संघटनांनी चालवलेले सामाजिक कार्य आणि दोन्ही देशातील सांस्कृतिक मूल्यं जतनाचा पूर्वपार प्रयत्नामुळे भारत-अमेरिकेमध्ये मैत्रीचे बंधन अधिक घट्ट झाले आहेत. तसेच यापुढेही वृद्धिंगत होतील असा आशावाद बाळगल्या जातो.

**-शशिकांत तोटे**
दारव्हा, जि. यवतमाळ
मो. ९१३०८३५४५८

# जिल्ह्यातील अमृत भारत रेल्वे स्थानकांच्या कामांचा दर्जा सुधारावा -खा. रवींद्र चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्ह्यातील अमृत भारत रेल्वे स्थानकांच्या कामांचा दर्जा सुधारावा यासह विविध समस्या आणि मागण्यांकडे लक्ष वेधत खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

अमृत भारत रेल्वे स्थानक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांचा दर्जा सुधारण्याबरोबरच नांदेड-मुंबई राज्यराणी एक्स्प्रेसला आधुनिक एलएचबी कोच उपलब्ध करून देणे आणि निजामाबाद-तिरुपती रायळसीमा एक्स्प्रेस नांदेडपर्यंत विस्तारित करून नियमित सुरू करणे, या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे.

अमृत भारत रेल्वे स्थानक योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यातील विविध रेल्वे स्थानकांच्या आधुनिकीकरणाची कामे सुरू आहेत. या कामांवर मोठ्या प्रमाणात सार्वजनिक निधी खर्च होत असताना काही ठिकाणी कामांचा दर्जा अपेक्षेप्रमाणे नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. त्यामुळे संबंधित कामांची सक्षम तांत्रिक अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करून कामांचा दर्जा निश्चित मानकांनुसार राखण्यात यावा, अशी मागणी खा. चव्हाण यांनी केली आहे.



निकृष्ट दर्जाचे काम आढळून आल्यास संबंधित कंत्राटदाराकडून ते काम दुरुस्त करून किंवा आवश्यकतेनुसार पुन्हा करून घेण्यात यावे, तसेच भविष्यातील कामांमध्ये गुणवत्ता नियंत्रण अधिक प्रभावी करावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. अमृत भारत योजनेचा उद्देश रेल्वेस्थानकांचा आधुनिक आणि सर्वांगीण विकास करणे हा असून, प्रवाशांना प्रत्यक्षात चांगल्या सुविधा मिळणे आवश्यक असल्याचे खासदार चकाण यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, नांदेड-मुंबई राज्यराणी एक्स्प्रेसमध्ये आधुनिक एलएचबी कोच उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी रेल्वेमंत्र्यांकडे केली आहे. नांदेड आणि मराठवाड्यातील प्रवाशांसाठी ही महत्त्वाची रेल्वे सेवा असून, सध्या वापरात असलेल्या जुन्या प्रकारच्या कोचच्या तुलनेत एलएचबी कोच उपलब्ध झाल्यास प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक प्रवासाची सुविधा मिळणार आहे. वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची विनंती त्यांनी केली आहे.

यासोबतच निजामाबाद - तिरुपती रायळसीमा एक्स्प्रेस नांदेडपर्यंत विस्तारित करून तिचे नियमित संचालन सुरू करावे, अशी मागणीही खासदार चव्हाण यांनी केली आहे. सध्या ही रेल्वे निजामाबाद आणि तिरुपतीदरम्यान धावत असून, मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी तसेच परिसरातील प्रवाशांना या सेवेचा मोठा फायदा होऊ शकतो. नांदेडपर्यंत विस्तार झाल्यास धार्मिक पर्यटन, व्यापार, शिक्षण आणि रोजगारासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठी सुविधा उपलब्ध होईल.

नांदेड हे मराठवाड्यातील महत्त्वाचे रेल्वे केंद्र असून, तख्त श्री हजूर साहिब यामुळे देशभरातून मोठ्या संख्येने भाविक नांदेडला येतात. त्यामुळे नांदेडला जोडणाऱ्या रेल्वे सेवांचा विस्तार आणि स्थानकांचा दर्जेदार विकास होणे आवश्यक असल्याचे खा. चव्हाण यांनी रेल्वेमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

## आज फुलवळ येथे रोजगार मेळावा

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड व स्वातंत्र्य सेनानी केशवराव धोंडगे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, फुलवळ, कंधार यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. १२ ऑगस्ट रोजी सकाळी १० वा.पासून स्वातंत्र्य सेनानी केशवराव धोंडगे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, फुलवळ, कंधार येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्लेसमेंट ड्राईव्ह/रोजगार मेळाव्यामध्ये विविध खाजगी आस्थापनामध्ये रोजगार व नोकरीच्या संधीसाठी मुलाखती घेण्यात येणार असून, जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांनी १२ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वा.पासून स्वातंत्र्य सेनानी केशवराव धोंडगे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, फुलवळ, कंधार येथे उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. रा. म. कोल्हे, सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र नांदेड यांनी केले आहे.

# क्रीडा स्पर्धा म्हणजे नव्या प्रतिभांना संधी मिळवून देणारे व्यासपीठ -भैरवनाथ नायकवाडी

**नांदेड (प्रतिनिधी)** – क्रीडा स्पर्धा म्हणजे नव्या प्रतिभांना संधी मिळवून देणारे व्यासपीठ असून, यातून अनेक नव्या दमाचे खेळाडू आपली प्रतिभा सिद्ध करताना दिसत आहेत, असे प्रतिपादन नांदेडचे जिल्हा क्रीडा अधिकारी भैरवनाथ नायकवाडी यांनी प्रतिभा निकेतन महाविद्यालयात अंतर महाविद्यालय क झोन बुद्धिबळ स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी केले.

प्रतिभा निकेतन महाविद्यालय, नांदेड आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बुद्धिबळ स्पर्धे च्या उदघाटन प्रसंगी भैरवनाथ नायकवाडी बोलत होते. पुढे बोलताना त्यांनी नोकरी व खेळ यासंबंधी स्वतःचे अनुभव व्यक्त करून स्पर्धकांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिभा निकेतन महाविद्यालयाचे प्रभारी क्रीडा संचालक व लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ.दीपक वाघमारे यांनी केले.

यावेळी त्यांनी प्रतिवर्षाप्रमाणे महाविद्यालय वेगवेगळ्या स्पर्धेचे आयोजन अनेक



वर्षांपासून यशस्वीपणे करत आहे. क-झोनचा स्पर्धेचा शुभारंभ या स्पर्धेपासून होत आहे, असे सांगितले. यावेळी क- झोनचे सचिव डॉ. महेश वाकरडकर, निवड समितीचे अध्यक्ष डॉ. चरणजीत सिंघ महाजन, उपप्राचार्य डॉ. दिलीप स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात स्पर्धकांना शुभेच्छा देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर म्हणाले की,खेळात जय - पराजय महत्त्वाचा नसून पराजयातूनही भविष्यातील विजयासाठी महत्त्वाची प्रेरणा घेता येते, असे सांगून त्यांनी खेळाडू स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. या उद्घाटकीय समारंभास कार्यालयीन समितीचे अध्यक्ष डॉ. मनोज पैंजणे, निवड समितीचे सदस्य डॉ. बाबुराव घायाळ, स्पर्धेचे पंच डॉ. श्रावण नीळकंठ, सिद्धार्थ हटकर, डॉ. रविंद्र लाठकर, डॉ. संजय हापगुंडे, डॉ. संदीप शिंदे डॉ. गजानन वाघमारे, डॉ. श्रीमंत राऊत, डॉ. राहूल वरवंटीकर, डॉ. प्रवीण स्वामी, डॉ. राजेश्वर कुंटूरकर, डॉ. श्रीकांत केंद्रे व कार्यालयीन अधीक्षक राजेश अय्यंगार तसेच विविध महाविद्यालयातून आलेले क्रीडा संचालक व स्पर्धक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. सोपान पावडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. ममता देशमुख यांनी केले.

# 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत विविध कार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या निर्देशानुसार राज्यात ९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत हर घर तिरंगा अभियान अंतर्गत विविध कार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत केंद्रीय संस्कृती मंत्रालयाने बैठकीत सूचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने घरोघरी तिरंगा व वंदे मातरम या गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पुढीलप्रमाणे विविध उपक्रम राबविण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी विविध विभाग, कार्यालयांना निर्देशीत केले आहे.

वंदे मातरम या गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने केंद्रीय गृह मंत्रालय यांच्या निर्देशाप्रमाणे संबंधित विभागाने कार्यवाही करून ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करावा, वंदे मातरम या गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याने देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम घ्यावा, घरोघरी तिरंगा अभियान तसेच वंदे मातरम या गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने प्रदर्शन आयोजित करावे, हर घर तिरंगा अभियान निमित्त तिरंगा रंगाची रोषणाई करणे, तिरंगा ई-बाईक रॅली, तिरंगा रॅली, सेल्फी विथ तिरंगा- वंदे मातरम या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तिरंगा सेल्फी, वंदे मातरम गीत असलेले व्हीडिओ Harghartiranga.com या वेबसाईटवर अपलोड करावे, वंदे मातरम या गीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने रांगोळी यासारख्या विविध उपक्रमांचा यात समावेश केला आहे. त्यानुसार संबंधित विभाग व कार्यालयाने कार्यवाही पूर्ण करावी. तसेच हर घर तिरंगा अभियान या अभियानासाठी एककेंद्री संपर्कासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या स्तरावर एक कक्ष निर्माण करण्यात आला असून, या कक्षाच्या प्रमुखपदी सहायक संचालक संदीप बलखंडे मो. ९७६३०६८०८३ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या अभियाना दरम्यान काही समस्या, प्रश्न उद्भवल्यास, सदरील कक्षाशी संपर्क साधावा. तसेच अधिक माहिती, स्वयंसेवक नोंदणी, सेल्फी अपलोड करण्यासाठी व तपशीलवार माहितीसाठी https://harghartiranga.com/ या संकेतस्थळाला भेट देऊन, योग्य ती कार्यवाही करावी. या अभियानांतर्गत उचित कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे dygennandedgmail.com या मेलवर २० ऑगस्ट २०२६ पर्यंत पाठविण्यात यावा, असेही जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी निर्देशीत केले आहे.

# गोदावरी अर्बन को- ऑपरेटिव्ह बँकेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न; सभासदांना ५ टक्के लाभांश जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील गोदावरी अर्बन को- ऑपरेटिव्ह बँक लि., वजिराबादची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. ९ ऑगस्ट रोजी प्रा. डॉ. आर. डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.

सभेचे सूत्रसंचालन बँकेचे संचालक प्रा. डॉ. एस. एम. टाले यांनी केले. बँकेचे व्यवस्थापक राम कल्याणकर यांनी सभेच्या सूचनांचे वाचन केले.

बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. आर. डी. देशमुख यांनी संचालक मंडळाचा अहवाल, सन २०२५- २०२६ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखा परीक्षकाची निवड, नफ्याचे वितरण, लेखा परीक्षण अहवाल व त्यावरील दोष दुरुस्ती अहवाल सभेत सादर केला.

बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कांचन आर. परिहार यांनी मागील सभेचे




इतिवृत्त, नफा- तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक व जीर्ण डेडस्टॉक राईट ऑफ करण्यास मान्यता मिळण्याबतचे वाचन केले.

बँकेचे संचालक प्रा. डॉ. मनीषा आर. देशमुख यांनी पोटनियम क्र. ८ मधील दुरुस्तीचा प्रस्ताव मांडला. तर प्रा. डॉ. जी. टी. वाघमारे यांनी आगामी वर्षाचे अंदाजपत्रक वाचून दाखवले.

सभेत सन २०२५- २०२६ च्या नफ्यातून सभासदांना ५ टक्के लाभांश देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. यामुळे उपस्थित सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण होते. बँकेचे संचालक अमरजितकौर संधू यांनी आभार प्रदर्शन केले.

## स्वाधार योजनेच्या नुतनीकरणासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– अनुसूचित जातीतील ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या आणि समाज कल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना राबविण्यात येत आहे. जिल्हा व तालुकास्तरावर राबविण्यात येणाऱ्या या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी नुतनीकरण अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ सप्टेंबर २०२६ आहे.

महानगरपालिका क्षेत्रापासून ५ किलोमीटरच्या आत तसेच नगरपालिका, नगर परिषद, नगरपंचायत आणि तालुक्याच्या हद्दीतील महाविद्यालयांमध्ये प्रवेशित असलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर आपला यूजर आयडी व पासवर्ड वापरून नुतनीकरणाचा अर्ज परिपूर्ण कागदपत्रांसह सादर करावा.

# विद्यार्थ्यांच्या मनोबल वाढीसाठी गुणांचे कौतुक करुन प्रोत्साहन द्यावे -डॉ. सायन्ना मठमवार



**नांदेड (प्रतिनिधी)**– शाळा एक ज्ञान मंदिर आहे. हे एक सुसंस्कार केंद्र आहे. आजचा विद्यार्थी शिस्तीच्या नावाखाली पाठीवरील दप्तराच्या ओझ्याने दबला जात आहे. त्यामुळे शारीरिक व मानसिक ताण वाढत आहे. म्हणून मुख्याध्यापक, शिक्षक, संस्था चालक आणि पालकांनी विद्यार्थ्यांचे पाठीवर ओझे कसे कमी करता येईल हे पहावे, असे आवाहन सेवानिवृत्त मुख्याध्यापक डॉ. सायन्ना मठमवार यांनी केले.

माधवराव वटेमोड प्राथमिक शाळा, जुना कौठा नांदेड येथे नुकतीच सहविचार सभा संपन्न झाली. या सहविचार सभेच्या अध्यक्षस्थानी आनंदमयी सेवाश्रम जुना कौठा, नांदेडचे ट्रस्टी डॉ. सायन्ना मठमवार हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून दीप झोळगे आणि सौ. अश्विनी यशवंतकर यांची उपस्थिती होती.

यावेळी प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. दिपाली मोरे तर आभार ताराबाई शिंदे यांनी मानले. सहविचार सभा यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक प्रवीणकुमार मुस्कावार, पूजा मठमवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आ. बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड तालुक्यातील नागापूर गावामध्ये नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या वाढदिवसानिमित्ताने सामाजिक बांधिलकी जोपासत युवा सेना तालुका बालाजी पाटील सपुरे यांनी समाजोपयोगी कार्याच्या माध्यमातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी आ. बोंढारकर यांचे ढोल ताशांच्या व फटाक्यांची आतीषबाजीत स्वागत करून सत्कार करण्यात आला.

नांदेड दक्षिणचे युवासेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील सपुरे यांनी वाढदिवसानिमित्त नागापूर जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स गणवेश मोफत वितरीत केला. गेल्या तीन वर्षांपासून बालाजी पाटील सपुरे यांचा हा स्तुत्य उपक्रम सुरू आहे. गेल्या वर्षी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना शालेय दप्तराचे वाटप केले



होते.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अंकुश पाटील मस्के यांनी केले. बालाजी पाटील सपुरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांचा सच्चा शिवसैनिक असल्याचे सांगत त्यांना राजकारणापेक्षा समाजकारण अधिक महत्त्वाचे असल्याने सांगितले.

याप्रसंगी युवासेनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष बाळू पाटील मोरे यांनी आ. बोंढारकर यांना जन्मदिनाच्या शुभेच्छा देत मंत्रिपदाची संधी मिळण्याच्या शुभकामना व्यक्त केल्या.

आ. बोंढारकर यांनी सत्काराला उत्तर देताना शाळेच्या चार भिंतीत देशाचे भवितव्य घडत असल्याचे सांगत गावातील विकासाचा केंद्रबिंदू जिल्हा परिषदेची शाळा असल्याचे सांगितले. गावातील राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी एकदिलाने जिल्हा परिषदेच्या शाळा टिकवणे, वाचवणे आणि वाढविणे स्वतःचे कर्तव्य समजले पाहिजे, असे मत व्यक्त केले. पुढे त्यांनी गावाच्या शाळेला दोन खोल्या मंजूर केल्याचे सांगून सभागृहासाठी वीस लाख रुपयांचा निधी देण्याचे जाहीर केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार मुख्याध्यापक अक्षय ढोके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहक्षिक्षिका पुष्पलता मावलीकर व धम्मदिना सोनकांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले. तिन्ही शिक्षकांचा आमदारांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी मंचावर गावचे सरपंच दिगंबर पाटील करडीले, उपसरपंच रामचंद्र पाटील करडीले, पैलवान कदम, माधवराव पाटील मस्के, संभाजी पाटील सपुरे, चेअरमन संजय करडीले, केशव पाटील मस्के, आनंदा पाटील मस्के, गजानन पाटील मस्के, मारोती पाटील मस्के, सुनील करडीले, सचिन सपुरे, रामचंद्र सपुरे, बळी करडीले, गजानन मस्के, शामराव करडीले, तंटामुक्ती अध्यक्ष दिलीप पाटील मस्के, गणेश पाटील मस्के, अशोक पाटील मस्के, योगेश मस्के, परसराम मस्के, तिरुपती करडीले, मारोती करडीले, रामा करडीले, गणा करडीले, व्यंकटी करडीले, शिवाजी करडीले, शंकर करडीले यांच्यासोबत गावातील प्रतिष्ठित नागरिकांची आणि युवकांची उपस्थिती होती.

# बजाज नगर नित्य योग वर्गातर्फे व्याख्यान संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)**– पतंजली योग समिती व श्रीकृष्ण योग इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने संचलित बजाजनगर नित्य योग वर्गातर्फे योगविद्याधाम नांदेड शाखेचे अध्यक्ष व आहारतज्ञ रमेश केंद्रे यांचे योग साधकांचा आहार-विहार या विषयवार व्याख्यान नुकतेच झाले.

यावेळी त्यांनी योग साधकांनी काय खावे, किती खावे, कधी खावे व काय खाऊ नये या विषयी त्यांनी तंत्रशुद्ध माहिती दिली. योग शिक्षक किशन भवर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले तर सोपानराव काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमास पंडित पाटील, शंकर परकंठे, गणेश संगेवार, लक्ष्मण परडे, वामनराव घण, हरिहर नरवाडे, आशा पावडे, लता काळे व सुप्रिया जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राघव दन्डे, अशोक नातेवाड, विजय गोविंदवाड, मीना कदम व जयश्री कल्याणकर यांनी परिश्रम घेतले.

# किनवट येथे 'एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती'ची बैठक संपन्न




**किनवट (प्रतिनिधी)**– पंचायत समिती किनवट येथे किनवट-माहूर तालुकास्तरीय एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची महत्त्वपूर्ण बैठक आ. भीमराव केराम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

आरोग्य सेवा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना आ. भीमराव केराम यांनी आरोग्य सेवा जास्तीत जास्त 'लोकाभिमुख' करण्यासाठी उपस्थितांना मार्गदर्शन केले. नागरिकांना वेळेवर व दर्जेदार आरोग्य सुविधा मिळण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी परस्परांशी उत्तम समन्वय ठेवून काम करावे, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. तसेच तालुक्यात दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांबद्दल त्यांनी समाधानही व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. के. पी. गायकवाड यांनी एकात्मिक आरोग्यवर्धिनी समिती स्थापन करण्यामागचा मुख्य उद्देश उपस्थितांसमोर मांडला. यासोबतच विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, माता व बाल रुग्ण तपासणी मोहिमा आणि त्यांतर्गत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती प्रास्ताविकाद्वारे दिली.

या बैठकीस किनवट व माहूर तालुक्यातील प्रशासकीय व आरोग्य विभागातील प्रमुख अधिकाऱ्यांची तसेच आरोग्य व इतर अधिकारी, ग्रामीण रुग्णालय माहूर व उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथील वैद्यकीय अधीक्षक, जिल्हास्तरीय माध्यम व प्रसिद्धी अधिकारी श्रीमती रेणुका दराडे यांची उपस्थिती होती.

पान १ वरून...

## मनपाच्या सर्वसाधारण सभेत...

घेऊन प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण करण्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. नवीन जोडण्यांमुळे विद्यमान ग्राहकांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार नसल्याचेही सांगण्यात आले.

आरोग्य व्यवस्थेवर सभेत विशेष चर्चा झाली. यावेळी नगरसेवक साहेबराव गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे शेरअली, भाजपच्या जयश्री पावडे, वैजनाथ देशमुख, संजय घोगरे, अभिषेक सौदे, सुमित मुथा, किशोर स्वामी, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे, स्थायी समिती सभापती वीरेंद्रसिंग गाडीवाले यांनी महापालिका रुग्णालयांमध्ये डॉक्टर, पॅरामेडिकल कर्मचारी, ईसीजी, रक्तशर्करा तपासणी, औषधसाठा, स्वच्छता आणि सुरक्षा सुविधा वाढविण्याची मागणी करण्यात आली. डॉक्टर व पॅरामेडिकल कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया आठ दिवसांत पूर्ण करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले. आयुष्मान भारत योजनेचा लाभ अधिकाधिक नागरिकांना मिळावा, यासाठी जनजागृती मोहीम राबविण्याची सूचनाही करण्यात आली.

देगलूर नाका परिसरातील वाहतूक कोंडी, प्रलंबित रस्ते आणि विविध कामांसाठी खोदलेले रस्ते पूर्ववत न करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्याची मागणी झाली. तसेच आगामी यात्रेच्या पार्श्वभूमीवर खोदलेले रस्ते तातडीने पूर्ववत करण्याची मागणी नगरसेवक नासेर आणि मसूद खान यांनी केली.

भू-संपादनाच्या प्रस्तावावरही कायदेशीर आणि आर्थिक बाबींवर चर्चा झाली. संबंधित जागेची प्रत्यक्ष पाहणी, क्षेत्रफळ निश्चिती, अचूक नकाशा, नगररचना विभागाचा अभिप्राय, जमिनीचे मूल्यांकन, भरपाईची रक्कम आणि निधीची उपलब्धता यांचा स्पष्ट अहवाल सभागृहापुढे ठेवण्याची मागणी करण्यात आली. संपूर्ण रस्त्याचे एकाचवेळी भू-संपादन करण्याऐवजी टप्प्याटप्प्याने भू-संपादनाचा पर्याय तपासण्याची सूचना झाली. आवश्यक असल्यास फेरविचार याचिका किंवा सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याची कायदेशीर शक्यताही तपासण्याची मागणी सभागृह नेते महेश कनकदंडे यांनी केली.

कंत्राटी कर्मचाऱ्यांचा प्रश्नही सभेत चांगलाच गाजला. पंप ऑपरेटरसह अनेक कर्मचारी १५ ते २० वर्षांपासून सेवा बजावत असूनही कंत्राटी पद्धतीने कार्यरत असल्याचा मुद्दा मांडण्यात आला. नियमितीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेचा अभ्यास करून एका महिन्यात निर्णय घेण्याचे प्रशासनाने आश्वासन दिले. दरम्यान, पंप ऑपरेटरना विभागप्रमुखांच्या अहवालानुसार दर सहा महिन्यांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यास सभेने मान्यता दिली. या विषयावर लवकरात तोडगा काढू असा विश्वास सभागृहाला आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी दिला.

पशुवैद्यकीय विभागातील कंत्राटी नियुक्तीवरूनही खर्चाच्या कार्यक्षमतेचा मुद्दा उपस्थित झाला. कत्तलखान्यात कत्तलपूर्व तपासणीसाठी शामराव खुणे यांची ९२ हजार ७० रुपये मासिक मानधनावर नियुक्ती करण्यात आली होती. मुदत संपल्यानंतर पुढील सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याच्या प्रस्तावावर चर्चा झाली. यावेळी काही नगरसेवकांनी याच रकमेत चार तरुण पशुवैद्यकांची नियुक्ती करता येईल, असा सवाल उपस्थित केला.

प्रभाग क्रमांक चारमधील रामनगर आणि प्रभाग क्रमांक एक मधील एका चौकाला कैलासवासी गोपीनाथराव मुंडे चौक असे नामकरण करण्याची सूचना दयानंद वाघमारे आणि योगेश मुंडे यांनी मांडली. प्रभाग क्रमांक १४ व १५ ला जोडणारा गुरुद्वारा ते उर्दू घर मार्ग पुढे बिलाल नगरपर्यंत विकसित करून यात्रेकरूंसाठी समांतर मार्ग उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव नीलम गुरुखुद्दे यांनी मांडला.

पशुवैद्यकीय विभागासाठी कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत साहेबराव गायकवाड यांनी प्रस्ताव मांडला. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांमधून विकासकामांना निधी मिळविण्यासाठी प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी पाठविण्याची मागणी स्थायी समितीचे सभापती वीरेंद्रसिंघ गाडीवाले यांनी केली.

एकूणच या महासभेत राजकीय संघर्षापासून ते शहराच्या मूलभूत प्रश्नांपर्यंत अनेक विषयांनी प्रशासनाची कसोटी घेतली. घोषणाबाजी आणि सभात्यागाने सभेचे राजकीय तापमान वाढले असले, तरी आता चर्चेत आलेल्या प्रश्नांवर प्रत्यक्ष निर्णय आणि त्याची अंमलबजावणी कधी होते, याकडे नांदेडकरांचे लक्ष लागले आहे.

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय



# कॉक्सीडिनिया!

**सतत अनेक तास बसून काम करणे किंवा चुकीच्या पद्धतीने बसण्यामुळे केवळ कंबर आणि खांदेदुखीच होत नाही, तर मणक्याच्या शेवटच्या भागातील टेलबोन अर्थात शेपटीच्या हाडातही वेदना होऊ शकतात. या समस्येला वैद्यकीय भाषेत कॉक्सीडिनिया (Coccydynia) असे म्हणतात.**

आजच्या काळात कार्यालयीन काम, 'वर्क फ्रॉम होम' किंवा तासन्‌तास संगणक, मोबाइल आणि अन्य स्क्रीनसमोर बसणे ही अनेकांची दैनंदिन सवय झाली आहे. मात्र, दीर्घकाळ एकाच स्थितीत बसल्यामुळे टेलबोनवर सातत्याने दबाव येतो. परिणामी त्या भागात वेदना, सूज किंवा स्नायूंमध्ये ताण निर्माण होऊ शकतो.

## 'टेलबोन पेन'कडे अजिबात दुर्लक्ष करू नका; जाणून घ्या कारणे, लक्षणे अन् उपचार

### » जास्त वेळ बसण्यामुळे टेलबोनमध्ये वेदना का होतात?

तज्ज्ञांच्या मते, दीर्घकाळ बसल्यामुळे टेलबोनवर थेट आणि सातत्याने दबाव येतो. विशेषतः कठीण पृष्ठभागावर चुकीच्या स्थितीत बसण्याची सवय असल्यास ही समस्या अधिक जाणवू शकते. सततच्या दबावामुळे टेलबोनच्या आसपास सूज किंवा स्नायूंमध्ये ताण निर्माण होऊ शकतो. पेल्विक फ्लोअर आणि नितंबांच्या स्नायूंमध्ये ताठरपणा किंवा आकडीसारखी स्थिती निर्माण होऊन वेदना वाढू शकतात.

### » कोणाला धोका अधिक असतो?

टेलबोनचा त्रास कोणालाही होऊ शकतो. मात्र, काही व्यक्तींमध्ये त्याचा धोका तुलनेने अधिक असतो. यात दीर्घकाळ बसून काम करणारे लोक, सतत किंवा अनेक तास वाहन चालवणारे लोक, प्रसूतीनंतरच्या महिला, टेलबोनला यापूर्वी दुखापत झालेल्या व्यक्ती, दिवसभर बहुतांश वेळ बसून राहणारे लोक, शरीराचे वजन जास्त असलेल्या व्यक्ती या व्यक्तींचा समावेश आहे.

### » टेलबोनचे दुखणे दुर्लक्षित करू नका

सतत बसून काम करणाऱ्या व्यक्तींनी दर काही वेळाने उठून चालणे, स्ट्रेचिंग करणे आणि योग्य आसनस्थिती ठेवणे महत्त्वाचे आहे. तसेच शरीराचे वजन नियंत्रणात ठेवणेही उपयुक्त ठरते. टेलबोनच्या भागात सतत वेदना होत असतील, वेदना वाढत असतील किंवा दैनंदिन कामांमध्ये अडथळा येत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या. योग्य वेळी तपासणी आणि उपचार केल्यास त्रास कमी करण्यास मदत होऊ शकते.

### » टेलबोनच्या दुखण्यापासून बचाव कसा कराल?

तासन्‌तास बसून काम करण्याची सवय असल्यास काही सोपे बदल केल्याने टेलबोनवरील दबाव कमी करता येतो. दर ३० ते ६० मिनिटांनी उठून थोडे चालावे किंवा शरीर ताणावे. बसताना पाठ सरळ ठेवावी. योग्य आसनस्थितीची सवय लावून घ्यावी. टेलबोनवर थेट दबाव कमी करण्यासाठी योग्य प्रकारच्या कुशनचा वापर करावा. पाठ आणि नितंबांचे स्नायू मजबूत करण्यासाठी नियमित व्यायाम किंवा योगासने करावीत. शरीराचे वजन नियंत्रणात ठेवावे. दीर्घकाळ एकाच स्थितीत बसणे टाळावे. या उपायांमुळे सौम्य स्वरूपाच्या त्रासात आराम मिळू शकतो. मात्र, वेदना कायम राहत असल्यास किंवा वाढत असल्यास केवळ घरगुती उपायांवर अवलंबून राहू नये.

### टेलबोनच्या दुखण्यावर उपचार काय?



- » काही काळ विश्रांती घेण्याचा सल्ला.
- » बसण्याची आणि दैनंदिन हालचालींची पद्धत बदलणे.
- » बर्फ किंवा गरम पाण्याच्या पिशवीने शेक देणे.
- » फिजिओथेरपी आणि स्ट्रेचिंग व्यायाम.
- » आवश्यकतेनुसार डॉक्टरांच्या सल्ल्याने वेदनाशामक औषधे.
- » बहुतेक प्रकरणांमध्ये शस्त्रक्रियेची गरज भासत नाही. मात्र, समस्या गंभीर असल्यास आणि इतर उपचारांचा फायदा होत नसल्यास काही निवडक प्रकरणांमध्ये शस्त्रक्रियेचा विचार केला जाऊ शकतो.

### टेलबोन म्हणजे काय?

टेलबोन म्हणजे कॉक्सिक्स (Coccyx). हा मणक्याच्या अगदी खालच्या टोकाला असलेला हाडांचा छोटा भाग आहे. आपण बसतो तेव्हा शरीराच्या वजनाचा काही भाग या भागावर पडतो. त्यामुळे टेलबोनवर सतत दबाव पडल्यास त्या ठिकाणी वेदना सुरू होऊ शकतात. या स्थितीला कॉक्सीडिनिया म्हणतात.

### टेलबोनच्या दुखण्याची प्रमुख कारणे

- » चुकीच्या स्थितीत बसणे.
- » टेलबोनवर सतत दबाव येणे.
- » कठीण पृष्ठभागावर बराच वेळ बसणे.
- » दीर्घकाळ वाहन चालवणे.
- » बराच वेळ एका बाजूला वाकून बसून काम करणे.
- » पडणे किंवा टेलबोनला दुखापत होणे.
- » शरीराचे वजन जास्त वाढणे.

### पाणी पिण्याबाबतचे मिथक आणि तथ्य

- » टेलबोनच्या दुखण्याची लक्षणे कशी ओळखाल?
- » टेलबोनच्या आसपास तीव्र किंवा सौम्य वेदना होणे.
- » बराच वेळ बसल्यानंतर वेदना वाढणे.
- » खुर्चीतून उठताना टेलबोनमध्ये दुखणे.
- » वाकताना किंवा पायऱ्या चढताना वेदना जाणवणे.
- » टेलबोनच्या आसपासचा भाग दुखरा किंवा अधिक संवेदनशील होणे. लैंगिक संबंधांच्या वेळी वेदना होणे.

# दिवसाला 8 ग्लास पाणी पिणे खरंच आवश्यक आहे का?

## पाणी पिण्याची योग्य पद्धत जाणून घ्या; या चुका टाळा...





**अनेकांकडून एकच सल्ला दिला जातो, दिवसाला किमान २ लिटर किंवा ८ ग्लास पाणी प्यावे. मात्र, प्रत्येक व्यक्तीला नेमके २ लिटर पाणी आवश्यक असतेच असे नाही. शरीराची पाण्याची गरज व्यक्तीचे वय, शारीरिक हालचाली, हवामान, कामाचे स्वरूप आणि आरोग्य यावर अवलंबून असते. त्यामुळे ठरावीक प्रमाणात पाणी पिण्यापेक्षा शरीराला आवश्यक तेवढे पाणी योग्य अंतराने पिणे अधिक महत्त्वाचे आहे. तसेच एकाच वेळी मोठ्या प्रमाणात पाणी पिणेही टाळावे.**

पाणी हे मानवी शरीरासाठी अत्यावश्यक आहे. United States Geological Surveyच्या माहितीनुसार प्रौढ व्यक्तीच्या शरीराच्या वजनापैकी सुमारे ६० टक्के भाग पाण्याचा असतो. शरीराचे तापमान नियंत्रित ठेवणे, पोषकद्रव्ये पेशींपर्यंत पोहोचवणे आणि मूत्रपिंडांच्या माध्यमातून शरीरातील टाकाऊ पदार्थ बाहेर काढणे अशा अनेक महत्त्वाच्या कार्यांमध्ये पाण्याची भूमिका असते. मात्र, केवळ भरपूर पाणी पिणे पुरेसे नाही; कधी, किती आणि कशा पद्धतीने पाणी प्यावे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

### रोज किती पाणी प्यावे?

**प्रत्येक व्यक्तीची पाण्याची गरज वेगळी असते. वय, लिंग, शारीरिक हालचाल, हवामान आणि आरोग्य यानुसार पाण्याची आवश्यकता बदलू शकते. National Academies of Sciences, Engineering, and Medicineच्या मार्गदर्शक माहितीनुसार दररोजच्या एकूण पाण्याच्या गरजेचे साधारण अशी :**

| वयोगट | दररोजची एकूण पाण्याची गरज |
|---|---|
| १ ते ३ वर्षे | सुमारे १ लिटर |
| ४ ते ८ वर्षे | सुमारे १.१८ लिटर |
| ९ ते १३ वर्षे | सुमारे १.६५ लिटर |
| १४ ते १८ वर्षे | सुमारे २.६ लिटर |
| १९ वर्षांवरील पुरुष | सुमारे ३.०७ लिटर |
| १९ वर्षांवरील महिला | सुमारे २.१२ लिटर |
| गर्भवती महिला | सुमारे २.३६ लिटर |
| स्तनपान करणाऱ्या महिला | सुमारे ३.०७ लिटर |

महत्त्वाचे : हे प्रमाण केवळ साध्या पाण्यापुरते मर्यादित नाही. दूध, सूप, फळे, भाज्या आणि इतर पेयांमधून मिळणाऱ्या पाण्याचाही एकूण पाण्याच्या गरजेत समावेश होतो.

### पाणी पिताना कोणत्या चुका टाळाव्यात?

- » कमी वेळेत खूप जास्त पाणी पिऊ नका : अल्पावधीत मोठ्या प्रमाणात पाणी प्यायल्यास शरीरातील सोडियमचे प्रमाण असामान्यरीत्या कमी होऊ शकते. या स्थितीला हायपोनेट्रेमिया (Hyponatremia) म्हणतात. गंभीर स्थितीत मेंदूच्या पेशींवर सूज येऊ शकते आणि हा त्रास जीवघेणाही ठरू शकतो.
- » फक्त '८ ग्लास' या नियमावर अवलंबून राहू नका : दिवसाला ८ ग्लास पाणी पिणे हा प्रत्येक व्यक्तीसाठी लागू होणारा निश्चित नियम नाही. शरीराची पाण्याची गरज व्यक्तीनुसार बदलते.
- » साखरयुक्त पेयांना पाण्याचा पर्याय मानू नका : शीतपेय, साखरयुक्त ज्यूस किंवा इतर गोड पेये पाण्याला पर्याय नाहीत. अशा पेयांमधून शरीराला अतिरिक्त साखर आणि कॅलरी मिळू शकतात. साधे पाणी हा हायड्रेशनसाठी अधिक योग्य पर्याय आहे.
- » तहान आणि शरीरातील पाण्याची कमतरता दुर्लक्षित करू नका : वारंवार तहान लागणे, तोंड कोरडे पडणे, थकवा, चक्कर येणे किंवा लघवीचा रंग गडद होणे ही शरीरात पाण्याची कमतरता असल्याची संभाव्य लक्षणे असू शकतात.

### पाणी पिण्याबाबतचे मिथक आणि तथ्य

- » **मिथक : प्रत्येकाने दिवसाला ८ ग्लास पाणी प्यायलाच हवे.**
- » तथ्य : प्रत्येक व्यक्तीला २ लिटर किंवा ८ ग्लास पाणी आवश्यक असतेच असे नाही. वय, वजन, हवामान, शारीरिक हालचाल, गर्भावस्था आणि आरोग्याच्या स्थितीनुसार पाण्याची गरज बदलते.
- » **मिथक : चहा आणि कॉफी शरीराला हायड्रेट करत नाहीत.**
- » तथ्य : चहा आणि कॉफीमधूनही शरीराला द्रवपदार्थ मिळतात. मात्र, शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी साधे पाणी हा उत्तम पर्याय आहे. चहा किंवा कॉफीचे अतिसेवन टाळावे.
- » **मिथक : जेवताना पाणी पिऊ नये.**
- » तथ्य : जेवताना थोड्या प्रमाणात पाणी प्यायल्यास अन्न गिळण्यास मदत होऊ शकते. मात्र, एकाच वेळी मोठ्या प्रमाणात पाणी पिणे टाळावे.
- » **मिथक : जितके जास्त पाणी प्याल तितके आरोग्यासाठी चांगले.**
- » **तथ्य :** शरीराच्या गरजेपेक्षा जास्त पाणी पिणेही घातक ठरू शकते. अतिप्रमाणात पाणी प्यायल्याने हायपोनेट्रेमियाचा धोका निर्माण होऊ शकतो.



### पाणी पिण्याची योग्य पद्धत कोणती?

- » तहान लागल्यावर पाणी प्या : तहान लागणे हे शरीराला द्रवपदार्थांची गरज असल्याचे संकेत असू शकतात. त्यामुळे तहान लागल्यावर पाणी प्यावे. मात्र, वृद्ध व्यक्ती, लहान मुले किंवा काही आजार असलेल्या व्यक्तींमध्ये तहान लागण्याची जाणीव कमी किंवा उशिरा होऊ शकते. अशा व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार नियमित अंतराने द्रवपदार्थ घ्यावेत.
- » एकाच वेळी भरपूर पाणी पिऊ नका : दिवसभराचे पाणी एकाच वेळी पिण्याऐवजी थोडे-थोडे करून प्यावे. यामुळे शरीराला द्रवपदार्थांचा योग्य वापर करता येतो.
- » हवामान आणि शारीरिक हालचालींचा विचार करा : उन्हाळ्यात, व्यायाम करताना किंवा मोठ्या प्रमाणात घाम येत असल्यास शरीराला अधिक द्रवपदार्थांची गरज भासू शकते. अशा वेळी पाण्यासोबत शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सची कमतरता भरून काढण्याचीही गरज असू शकते.
- » लघवीच्या रंगाकडे लक्ष द्या : सामान्यतः शरीर पुरेसे हायड्रेटेड असल्यास लघवीचा रंग फिकट पिवळा असू शकतो. अतिशय गडद पिवळी लघवी ही शरीरात पाण्याची कमतरता असल्याचे संकेत देऊ शकते. मात्र, काही औषधे आणि जीवनसत्त्वांच्या पूरक गोळ्यांमुळेही लघवीचा रंग बदलू शकतो. त्यामुळे केवळ लघवीच्या रंगावरून निष्कर्ष काढू नये.
- » फळे आणि भाज्यांमधूनही पाणी मिळते : संत्रे, काकडी, कलिंगड, नारळपाणी तसेच अनेक फळे आणि भाज्यांमधून शरीराला पाणी मिळते. मात्र, केवळ फळे आणि भाज्यांवर अवलंबून राहणे पुरेसे नाही.



### तज्ज्ञांचा महत्त्वाचा सल्ला

गुरुग्राम येथील Marengo Asia Hospitalsच्या क्लिनिकल आहारतज्ज्ञ मीनाक्षी अग्रवाल यांच्या मते, 'तहान लागली कीच पाणी प्यावे' हा नियम प्रत्येकाला तंतोतंत लागू होत नाही. वृद्ध व्यक्ती, लहान मुले, खेळाडू आणि काही आजार असलेल्या व्यक्तींना तहान लागण्याची जाणीव उशिरा होऊ शकते. त्यामुळे अशा व्यक्तींनी नियमित अंतराने द्रवपदार्थ घेणे आवश्यक असू शकते. तसेच, लघवीचा फिकट पिवळा रंग सामान्य हायड्रेशनचे संकेत देऊ शकतो; मात्र जीवनसत्त्वांच्या पूरक गोळ्या, काही औषधे आणि इतर कारणांमुळेही रंग बदलू शकतो. फळे आणि भाज्यांमधून शरीराला मोठ्या प्रमाणात पाणी मिळते, हे खरे आहे. मात्र, केवळ त्यांच्यावर अवलंबून राहणे पुरेसे नाही.

# तुपाबाबत वर्षानुवर्षे सांगितलेली भीती चुकीची होती का?

**भारतीय आहारपद्धतीत तुपाला अनेक वर्षांपासून महत्त्वाचे स्थान आहे. पूर्वीच्या पिढ्या तुपाला ताकद आणि ऊर्जा देणारा पदार्थ मानत असत. मात्र, कालांतराने तूप हृदयासाठी घातक असल्याचा समज निर्माण झाला. तूप खाल्ल्याने कोलेस्टेरॉल वाढते आणि हृदयविकाराचा धोका वाढू शकतो, अशी भीती अनेकांच्या मनात निर्माण झाली. मात्र, तुपाबाबतची ही जुनी धारणा पूर्णपणे अचूक आहे का? नव्या संशोधनातून या विषयाकडे अधिक बारकाईने पाहण्याची गरज असल्याचे समोर येत आहे.**

### तूप हानिकारक का मानले गेले?

तुपामध्ये संतृप्त चरबी (Saturated Fat) मोठ्या प्रमाणात असते. १९५०च्या दशकात वैज्ञानिक अँसेल कीज यांच्या संशोधनानंतर संतृप्त चरबी आणि हृदयविकार यांच्यातील संभाव्य संबंधाबाबत मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू झाली. त्यानंतर जगभरातील पोषणविषयक मार्गदर्शक तत्त्वांवरही त्याचा प्रभाव पडला. संतृप्त चरबीचा संबंध हृदयविकाराच्या धोक्याशी जोडला गेल्यामुळे तुपाकडेही त्याच दृष्टिकोनातून पाहिले गेले. मात्र, प्रत्येक प्रकारची संतृप्त चरबी शरीरावर एकसारखाच परिणाम करते का, तसेच एखादा पदार्थ आहारातील इतर पदार्थांच्या जागी कशा प्रकारे वापरला जातो, याकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही, असा युक्तिवाद आता केला जात आहे.

### नव्या संशोधनातून काय समोर आले?

अलीकडील संशोधनामुळे तुपाबाबतची चर्चा अधिक गुंतागुंतीची झाली आहे. या वर्षी 'प्रोग्रेस इन न्यूट्रिशन'मध्ये प्रकाशित झालेल्या एका मेटा-विश्लेषणात १० संशोधनांचा आणि सुमारे २० हजार व्यक्तींच्या माहितीचा आढावा घेण्यात आला. तूप सेवन करणाऱ्या व्यक्तींमध्ये कोरोनरी आर्टरी डिसीज (हृदयाशी संबंधित आजार) होण्याच्या प्रमाणात किंचित वाढ आढळल्याचे नमूद करण्यात आले. मात्र, त्याच वेळी त्यांच्या कोलेस्टेरॉल किंवा ट्रायग्लिसराइडच्या पातळीत सरासरी ठोस बदल आढळला नाही. यावरून तुपाचे सेवन आणि हृदयविकार यांच्यातील संबंध केवळ तुपाच्या सेवनावर अवलंबून आहे असे सरळपणे म्हणता येत नाही. व्यक्ती किती तूप खाते, त्याच्या आहारात इतर कोणते पदार्थ आहेत आणि एकूण आहाराची गुणवत्ता कशी आहे, याचाही परिणाम होऊ शकतो. म्हणूनच 'तूप म्हणजे हृदयासाठी घातक' किंवा 'तूप पूर्णपणे सुरक्षित आहे', असे कोणतेही टोकाचे निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही.

### ग्रामीण भागातील आहाराकडेही लक्ष देणे गरजेचे

संतृप्त चरबी आणि हृदयविकार यांच्यातील संबंधाचा पारंपरिक सिद्धांत भारतातील ग्रामीण लोकसंख्येच्या संदर्भातही तपासला जात आहे. काही ग्रामीण भागांमध्ये अनेक वर्षे तुपाचे तुलनेने अधिक सेवन करणाऱ्या लोकांमध्ये हृदयविकाराचा धोका अपेक्षेइतका जास्त आढळत नसल्याचे काही निरीक्षणात्मक अभ्यासांमधून सूचित झाले आहे. मात्र, याचा अर्थ कितीही तूप खाल्ले तरी ते सुरक्षित आहे, असा होत नाही. यावरून एवढेच सूचित होते की, प्रत्येक प्रकारच्या संतृप्त चरबीचा हृदयावर समान परिणाम होतो, असा जुना निष्कर्ष संपूर्ण चित्र स्पष्ट करत नाही. तुपाचे सेवन मर्यादित प्रमाणात करणे महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ, आहारात थोड्या प्रमाणात तूप वापरून त्यासोबत भाज्या, कडधान्ये आणि संपूर्ण धान्यांचा समावेश करता येतो. मात्र, मोठ्या प्रमाणात तूप आणि त्यासोबत रिफाइंड कार्बोहायड्रेट्स म्हणजेच मैदा, साखर आणि अतिप्रक्रिया केलेले पदार्थ यांचे सेवन केल्यास आहाराचे एकूण स्वरूप बदलते. त्यामुळे आरोग्यावर परिणाम करणारा घटक केवळ 'तूप खाल्ले की नाही' हा नसून तूप किती प्रमाणात खाल्ले, त्यासोबत काय खाल्ले आणि एकूण आहार कसा आहे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

# विभागीय माहिती कार्यालयात सहाय्यक संचालकपदी सुरेश पाटील रुजू



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** – छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय माहिती कार्यालयातील सहाय्यक संचालक (वर्ग-२, राजपत्रित) पदावर सुरेश पाटील रुजू झाले. उपसंचालक प्रवीण टाके यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

विद्यमान सहाय्यक संचालक गणेश फुंदे यांची जिल्हा माहिती अधिकारी, पुणे येथे बदली झाल्याने रिक्त झालेल्या पदावर पाटील यांनी फुंदे यांच्याकडून पदभार स्वीकारला.उपसंचालक प्रवीण टाके यांच्या मार्गदर्शनात ते काम करणार आहेत.

सहाय्यक संचालकपदी रुजू होण्यापूर्वी पाटील हे शिर्डी येथे माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. या सेवाकाळात त्यांनी जळगाव आणि अहिल्यानगर जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभारही सांभाळला. सुरेश पाटील यांनी पत्रकारितेतील पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. दैनिक सकाळ, पुढारी आणि सायं दैनिक लोकमान्य सांजवर्ता या वृत्तपत्रांमध्ये त्यांनी बातमीदारी केली आहे. याशिवाय प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नाशिक यांच्या कार्यालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत होते. छत्रपती संभाजीनगर विभागातील वृत्त व माहितीसाठी त्यांच्याशी दूरध्वनी क्रमांक ७०२८५८६९१९ वर संपर्क साधता येईल.

## विमानतळांच्या धर्तीवर होणार १४७ बसस्थानकांचा कायापालट

**मुंबई (प्रतिनिधी)** – महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाच्या मालकीच्या जागांचा सार्वजनिक - खासगी भागीदारीच्या (पीपीपी) माध्यमातून कायापालट करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या अंतर्गत पहिल्या टप्प्यात राज्यातील १४७ बसस्थानकांचा विमानतळांच्या धर्तीवर विकास केला जाणार आहे. येथे उभारण्यात येणारी नवीन बसस्थानके 'आयकॉनिक' आणि शहराच्या सौंदर्यात भर घालणारी असावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृहावर आयोजित एका उच्चस्तरीय आढावा बैठकीत ते बोलत होते. या पुनर्विकासात प्रवाशांच्या अत्याधुनिक सुविधांसोबतच हॉस्पिटल, चित्रपटगृहे आणि नागरिक सेवा केंद्रांचाही समावेश असणार आहे.

## टी.सी. हरवली

माझी संगमेश्वर नागनाथ चोंडे या नावाची १० वी पासची टी.सी. बिलोली ते देगलूर बस प्रवासात हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता–**
**संगमेश्वर नागनाथ चोंडे**
**मु. बिजूर, ता. बिलोली**
**जि. नांदेड**

## टी.सी. हरवली

माझी, जयश्री बालाजी नरेवाड या नावाची छत्रपती शिवाजी ज्युनिअर कॉलेज सगरोळी ची इयत्ता १२ वी पासची टि.सी बिलोली ते नांदेड बस प्रवास करताना हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर आणून द्यावी.

**– संपर्क पत्ता –**
**जयश्री बालाजी नरेवाड**
**रा.भोसी ता. बिलोली जि. नांदेड मो.नं. ७४९८४५७२३६**

## Change In Name

My old Name is **SAMINA BEGUM SHAKEEL AHMED** Which now I am Changing as New Name **SAMINA BEGUM** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name.

**Address: H.NO.6-3-219, FARUKH PASHA ROAD, QUEEN COLLECTION, MANIYAR GALLI, ITWARA, Nanded, 431604**
**Mob: 9823111274**

## Change In Name

My Old Name is **MOHSINA BEGAM MOHAMAD** Which Now I Am Changing As New Name **MOHSINABEGUM ISA SHAIKH.** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## Change In Name

My Old Name is **MOHSINA BEGUM MOHAMMED ISA** Which Now I Am Changing As New Name **MOHSINABEGUM ISA SHAIKH.** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## Change In Name

My Old Name is **MOHAMMED ISA ABDUL KHADARSAB** Which Now I Am Changing As New Name **ISA ABDULKHADAR SHAIKH.** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## जाहीर प्रगटन

मौजे तरोडा (खु.) ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील गट नं. ९५ मधील शिवराय पार्क शिवराय नगर मधील प्लॉट नं. १/७ साईज ३० बाय ६० ज्याचे एकूण क्षेत्रफळ अंदाजे १८०० चौ.फुटाचा प्लॉट निझार निरूद्दीन लालाणी यांच्याकडून हणमंतराव वागजी बळदे रा. स्वप्नजा गार्डन, झेंडा चौक नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतु:सिमा- पूर्वेस - प्लॉट नं. १/६, पश्चिमेस - प्लॉट नं. १/८, दक्षिणेस - निखाते यांची प्लॉटिंग व उत्तरेस - ३० फुटाचा रोड.

तरी वरील चतु:सिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत हणमंतराव वागजी बळदे यांच्या नावे करून घेण्यात येईल.


करीता हे जाहिर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**हणमंतराव वागजी बळदे**
**रा. स्वप्नजा गार्डन, झेंडा चौक, नांदेड**
**मो.नं. ९०९६९१११५१**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



## टी.सी. हरवली

माझी नौशाबा फरहत शेख फारूख या नावाची इयत्ता १२ वीची टि.सी मगदुम नगर ते बर्की चौक ऑटो प्रवास करताना हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर आणून द्यावी.

**– संपर्क पत्ता –**
**नौशाबा फरहत शेख फारूख**
**रा. घर नं. १–४–४४९, गल्ली नं. १९, मगदुम नगर नांदेड**

## टी.सी. हरवली

माझी शेख अब्दुल अजीम शेख अब्दुल सत्तार या नावाची इयत्ता ८ वी पासची टि.सी बसस्टँड ते नई आबादी प्रवास करताना हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर आणून द्यावी.

**– संपर्क पत्ता –**
**शेख अब्दुल अजीम**
**शेख अब्दुल सत्तार**
**रा. नई आबादी, नांदेड**
**मो.नं. ९८५०९३७९५७**

## Change In Name

My old Name is **MOHAMMED JAVEED SHAIKH** Which now I am Changing as New Name **MOHAMMED JAVEED MOHAMMED SALEEM.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**Address: H.NO.13, ASRA NAGAR, AIRPORT ROAD, NEAR RAILWAY DIVISION, NANDED-431605 Mob: 8983137810**

## Change In Name

My old Name is **KUMTHEKAR VENKTESH SITARAM** Which now I am Changing as New Name **KUMATHEKAR VENKTESH SITARAM.** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name

**Address: S/o. KUMATHEKAR SITARAM ND- 42 - J3 - 56 / 03, SHIVNERI NAGAR, HUDCO, NEW NANDED, MAHARASHTRA PIN - 431603 MOB-8668523586**

## Change In Name

My Old Name is **MINHAJ BEGUM** which now I am Changing as New Name **MINHAJ TABASSUM MAHMAD RABBANI.** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

**Address -MINHAJ TABASSUM MAHMAD RABBANI**
**Sara Colony, Waghi Road, Nanded 431601 Mo.No. 9552959581**

## Change In Name

My Old Name is **MOHAMMED RABBANI** which now I am Changing as New Name **MAHMAD RABBANI GULAM SIDDIQUI** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

**Address -MAHMAD RABBANI GULAM SIDDIQUI**
**Sara Colony, Waghi Road, Nanded 431601 Mo.No. 9552959581**

## Change In Name

My Old Name is **BUSHRA ADEAN MOHAMMED RABBANI** which now I am Changing as New Name **BUSHRA ADEEN MAHMAD RABBANI** Hence forth my all correspondence will be done as per my New Name Please consider the same.

**Address - BUSHRA ADEEN MAHMAD RABBANI**
**Sara Colony, Waghi Road, Nanded 431601 Mo.No. 9552959581**

## जाहीर प्रगटन

सर्व संबंधितांना या जाहीर प्रगटना आधारे सूचित करण्यात येते की,मौजे वाडी (बु.),ता.जि.नांदेड,हद्दीतील सर्वे नं. ३६/बी,संगमेश्वरनगर मधील प्लॉट नं.११/अ,हा प्लॉट सौ.शांताबाई भ्र. उमाकांतराव आटकोरे,वय.७५ वर्षे,रा.हिंगोली गेट रोड,रेल्वे ब्रिज जवळ,नांदेड यांच्या मालकी व हक्काचा असून सदर प्लॉट त्यांनी दि.०७/११/२००१ रोजी दस्त क्र.४५३० अन्वये खरेदी केलेला आहे.

सदर प्लॉटचे क्षेत्रफळ १३५६ चौ.फुट (१२६.०२ चौ.मी.) असून त्याची चतु:सीमा खालीलप्रमाणे आहे :- पूर्वेस १५ फुट रुंद रोड,दक्षिणेस २० फुट रुंद रोड,पश्चिमेस १५ फुट रुंद रोड,उत्तरेस प्लॉट नं.१२/अ व १५/अ आहे. सदर प्लॉटची एकूण विक्री किंमत रु.२०,११,०००/- (अक्षरी.वीस लाख अकरा हजार केवळ) अशी ठरली असून, सदर प्लॉटबाबत सौ.शांताबाई भ्र. उमाकांतराव आटकोरे यांनी सौ.शिवकांता भ्र. गणेश साखरे, वय.४८ वर्षे, रा.पिंपळगांव (कु.), ता.बिलोली, जि.नांदेड यांच्या सोबत दि.१३/०७/२०२६ रोजी सौदाचिठ्ठी करून सदर प्लॉट विक्री करण्याचा करार केलेला आहे.

सदर सौदाचिठ्ठीनुसार रु.१,००,०००/- अनामत रक्कम प्राप्त झालेली असून उर्वरीत रु.१९,११,०००/- (अक्षरी.एकोणवीस लाख अकरा हजार केवळ) रक्कम प्राप्त करून सदर प्लॉटचे नोंदणीकृत विक्रीखत खरेदीदाराच्या नावे करून देण्याचे ठरलेले आहे. सदर प्लॉटबाबत कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, वारसाहक्क, ताबा, गहाण, बोजा, कर्ज, लीज, भाडेपट्टा, पूर्वीचा विक्रीचा करार, सौदाचिठ्ठी, हस्तांतरणाचा हक्क किंवा अन्य कोणताही हक्क/हितसंबंध/दावा असल्यास त्यांनी या जाहीर प्रगटनाच्या प्रसिद्धीपासून ०७ दिवसांच्या आत आपली हरकत/दावा आवश्यक त्या कागदपत्रांसह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात सादर करावा.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत अथवा दावा प्राप्त न झाल्यास,सदर प्लॉटबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणताही हक्क,दावा अथवा हितसंबंध नाही असे समजून पुढील नोंदणीकृत विक्रीखताची कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकतीस/दाव्यास संबंधित विक्रेता व खरेदीदार जबाबदार राहणार नाहीत.

हरकत/दावा सादर करण्याचा पत्ता :
खरेदीदार :
सौ.शिवकांता भ्र. गणेश साखरे
रा.भक्ती निवास,लाठकर यांचा वाडा,
यशवंत नगर,नांदेड-४३१६०५.
मो.क्र.९०९६९०९७२४

तर्फे
ॲड.ओमप्रकाश रमेशराव चिंचोलीकर
नांदेड,मो.क्र.७३८५५६३३२९

## जाहिर नोटीस

मा. श्रीमती हि. का. शेळके, धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड. यांचे न्यायालयात
(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम-१९५० चे कलम ७०-अ अन्वये)
रिव्हीजन अर्ज क्र. ४६/२०२६
छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, हातराळा ता. मुखेड जि. नांदेड. नों.क्र. एफ- १३७६ (नांदेड)

श्री. व्यंकटराव गंगाराम टेंभुर्णे -- अर्जदार
विरूध्द
श्री. संतोष बालाजी तगरखेडे व इतर ०१ -- गैरअर्जदार

ज्या अर्थी उपरनामित अर्जदार याने किरकोळ अर्ज क्र. ४६/२०२६ अन्वये न्यास नावे छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, हातराळा ता. मुखेड जि. नांदेड. नों.क्र. एफ- १३७६ (नांदेड) या न्यासासंदर्भात दाखल केलेला आहे.

त्या अर्थी या जाहिर प्रगटनाव्दारे
गैरअर्जदार क्र. ०१) श्री. संतोष बालाजी तगरखेडे रा. सिडको,नविन नांदेड ता. जि. नांदेड.
०२) श्री. पांडुरंग गंगाराम जाधव रा. सिडको,नविन नांदेड ता. जि. नांदेड.
.यांना कळविण्यात येते की, तुम्ही सदरच्या अर्जाच्या सुनावणी साठी दि. २०.०८.२०२६ रोजी ठिक : सकाळी ११:०० वाजता स्वत: व्यक्तीगतरीत्या किंवा आपल्या वकीलामार्फत हजर राहावे व आपली बाजु मांडावी , तसे न केल्यास उक्त अर्ज आपल्या गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी होउन निकाल केला जाईल.

आज दि. ११.०८.२०२६ रोजी माझया सहीनिशी व मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांच्या शिक्कनिशी सदरची नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

आदेशावरून.
(बा.भि. गंगावणे)
शिरस्तेदार

(श्रीमती पी. जे. रॉय)
अधिक्षक (न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड.

## जाहिर नोटीस

मा. श्रीमती हि. का. शेळके, धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड. यांचे न्यायालयात
(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम-१९५० चे कलम ७०-अ अन्वये)
रिव्हीजन अर्ज क्र. ४५/२०२६
छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, हातराळा ता. मुखेड जि. नांदेड. नों.क्र. एफ- १३७६ (नांदेड)

श्री. व्यंकटराव गंगाराम टेंभुर्णे -- अर्जदार
विरूध्द
श्री. माधव पांडुरंग जाधव व इतर ०१ -- गैरअर्जदार

ज्या अर्थी उपरनामित अर्जदार याने किरकोळ अर्ज क्र. ४५/२०२६ अन्वये न्यास नावे छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, हातराळा ता. मुखेड जि. नांदेड. नों.क्र. एफ- १३७६ (नांदेड) या न्यासासंदर्भात दाखल केलेला आहे.

त्या अर्थी या जाहिर प्रगटनाव्दारे
गैरअर्जदार क्र. ०१) श्री. माधव पांडुरंग जाधव रा. सिडको,नविन नांदेड ता. जि. नांदेड.
०२) श्री. गोपाल माधवराव कोठारे (खोठारे) रा. हातराळा ता. मुखेड जि. नांदेड.
.यांना कळविण्यात येते की, तुम्ही सदरच्या अर्जाच्या सुनावणी साठी दि. २०.०८.२०२६ रोजी ठिक : सकाळी ११:०० वाजता स्वत: व्यक्तीगतरीत्या किंवा आपल्या वकीलामार्फत हजर राहावे व आपली बाजु मांडावी , तसे न केल्यास उक्त अर्ज आपल्या गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी होउन निकाल केला जाईल.

आज दि. ११.०८.२०२६ रोजी माझया सहीनिशी व मा. धर्मादाय सह आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांच्या शिक्कनिशी सदरची नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

आदेशावरून.
(बा.भि. गंगावणे)
शिरस्तेदार

(श्रीमती पी. जे. रॉय)
अधिक्षक (न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड.

## जाहीर प्रगटन

श्रीमान एस.एम.कोळेकर दिवाणी न्यायधीश कनिष्ठ स्तर, धर्माबाद यांचे न्यायालय
दिवाणी किरकोळ अर्ज 115/2026
नागोराव पि. माधव सुर्यवंशी व इतर विरुद्ध निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा 1827 कलम 2 अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज.

अर्जदार : 1) नागोराव पि. माधव सुर्यवंशी वय-48 वर्ष, धंदा- मजुरी
रा. सिधार्थनगर बाळापुर ता. धर्माबाद जि. नांदेड
2) रेखा भ्र. अशोक बुद्धीवंत वय- 45 वर्ष, धंदा- घरकाम
रा. आलुर ता. धर्माबाद जि. नांदेड
3) रंजना भ्र. साईनाथ कांबळे वय-36 वर्ष, धंदा- घरकाम
रा. रामनगर ता. धर्माबाद जि. नांदेड

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

मयत : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट 1827 कलम 2 नुसार अर्जदार यांना कायेदशिर वारसा प्रमाणपत्र Legal Heirship Certificate प्रदान करणे,

सदरील जाहीर प्रगणाद्ववारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यातआपल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार हे मयताचे वारस असुन त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतेही वारस नसल्यामुळे त्यांना मयत माधव पि. लालु सुर्यवंशी यांचे निधन दि.29/09/2023 राजी झाले आहे आणि त्यांच्या मरणोपरांत मयताचे कायदेशिर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन कायदा 1827 कलम 2 अन्वये वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील ॲड. व्ही.एस. सोनकांबळे यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरील प्रमाणपत्र हे शासकीय व खाजगी कामासाठी आवश्यक असल्याबाबत नमुद केले आहे.

हे की प्रस्तुत प्रकरणात वरील ब्राबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथव उजर असल्यास त्यांनी त्याबाबतचे आपले म्हणणे सदरील प्रगटन प्रकाशित झाल्यापासुन विहित मुदतीच्याआत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहित धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आज दि. 07 / 08 /2026 रोजी माझ्या
सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यनीशी दिला
(न्यायालयाची मोहर)
आदेशावरून

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक,

## जाहीरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर , ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६२/ २०२६

पुढील तारीख – ११.०९.२०२६

अर्जदार : १) सुभद्राबाई भ्र. गंगाराम गादगे, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम,
२) मुकुंद पि. गंगाराम गादगे, वय ५२ वर्षे, धंदा शेती,
३) सुधीर पि. गंगाराम गादगे, वय ५० वर्षे, धंदा नोकरी,
४) सुनील पि. गंगाराम गादगे, वय ४८ वर्षे, धंदा नोकरी,
वरील सर्व रा. गांधीनगर, बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड
अर्जदार क्र. ०३ ह.मु. प्लॉट न. ६८६९ सेक्टर २८, बालाजी मंदिर मागे, नेरूळ नोड ३, ठाणे.
५) स्नेहलता भ्र. अभिमान बोधवड, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. जहांगीर मोह, ता. चोंडी, जि. बीड

विरुध्द.

गैरअर्जदार: निरंक

विषय- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०५ हे **मयत गंगाराम पि. संतुकराव गादगे** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ही **मयत गंगाराम पि. संतुकराव गादगे** यांची पत्नी आहे. अर्जदार क्रमांक ०२ ते ०५ हे **मयत गंगाराम पि. संतुकराव गादगे** यांचे अपत्ये आहेत. तसेच **मयत गंगाराम पि. संतुकराव गादगे** यांचे आई व वडिलांचा मृत्यु यापुर्वीच झाले. **मयत गंगाराम पि. संतुकराव गादगे** यांचा मृत्यु दिनांक १७.०९.२०२० रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०५ हयांना **मयत गंगाराम पि. संतुकराव गादगे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **मयत गंगाराम पि. संतुकराव गादगे** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **मयत गंगाराम पि. संतुकराव गादगे** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **मयत गंगाराम पि. संतुकराव गादगे** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **मयत गंगाराम पि. संतुकराव गादगे** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **मयत गंगाराम पि. संतुकराव गादगे** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०८/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
क. लिपीक सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली दिवाणी न्यायालय व. स्तर., बिलोली

## E-Tender Notice

੧ੴ ਸਤਿਗੁਰ ਪ੍ਰਸਾਦਿ ॥

ਤਖ਼ਤ ਸੱਚਖੰਡ ਸ੍ਰੀ ਹਜ਼ੂਰ ਅਬਿਚਲਨਗਰ ਸਾਹਿਬ, ਨਾਂਦੇੜ-੪੩੧੬੦੧ (ਮਹਾਰਾਸ਼ਟਰ)-ਭਾਰਤ

Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib, Nanded-431601 (Maharashtra) -India

Ph. No. 02462-234813, 241266, 243559, Fax No. 02462-234812
E-Mail-Contact@hazursahib.com Visit us at : http:www.hazursahib.com.

No.1095/26-27 Date.11/8/26

E-Tender Notice.

**Tender are Invited from Mandap Decoration and Lighting Decoration for Guru Granth Sahib Ji Bhavan for the Function of Gurupurab Dooj Guru-Ta-Gaddi going to be Celebrate.**

The Superintendent Takhat Sachkhand Sri Hazur Abchalnagar Sahib ,Nanded. Invites Online offers from experienced Contractors for Mandap Decoration and Lighting Decoration for Guru Granth Sahib Ji Bhavan for the Function of Gurupurab Dooj Guru-Ta-Gaddi going to be Celebrate under open ' E ' Tender System.

Under ' E ' Tender System.on Date 10 Aug 2026 Please refer our website htt:mahatender.gov.in & tender ID2026_TSHS_1326937_1.

The Uploaded "E" Tender Schedule is as below :-

| Sr. No. | Description of Tender | Date | Time |
|---|---|---|---|
| 1. | Date of Publish of " E " Tender | 10-08 2026 | 4.30 PM |
| 2. | Document Download/Sale Start Date | 10-08 2026 | 4.35 PM |
| 3. | Bid Submission Start Date | 10-08 2026 | 4.35 PM |
| 4. | Bid Opening Date | 10-08 2026 | 4.10 PM |
| 5 | Document Download/Sale End Date | 17-08 2026 | 5.00 PM |
| 6. | Bid Submission End Date | 17-08 2026 | 5.00 PM |

Superintendent,
Gurudwara Sachkhand Board,Nanded.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर'च्या आयोजनाबाबत

# जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक



**नांदेड (प्रतिनिधी)** -मृद व जलसंधारण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांचा जन्मदिन २१ ऑगस्ट हा दिवस 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्यानुषंगाने राज्यात १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान 'जलसंधारण सप्ताह' आयोजित करण्यात येणार आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दि. ११ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीत 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' या उपक्रमाच्या आयोजनाबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत राज्यव्यापी जनजागृती करून जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याच्या उद्देशाने २१ ऑगस्ट रोजी 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' (Maha Walkathon-Walk for Water) या उपक्रमाचे राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये आयोजन करण्यात येणार आहे. याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

तसेच येत्या १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान जिल्ह्यात 'जलसंधारण सप्ताह' प्रभावीपणे साजरा करण्याच्या दृष्टीने संबंधित सर्व यंत्रणांनी आवश्यक नियोजन करून समन्वयाने कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिल्या.

# जय हनुमान सहकारी संस्थेच्या नावाने फसवणूक

## खोटे दस्त बनवून प्लॉटधारकांची ६ जणांनी केली फसवणूक; ग्रामीण पोलिसांकडून तपास सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)**-तालुक्यातील धनेगाव- मुजामपेठ आणि बळीरामपूर येथील जय हनुमान मागासवर्गीय सहकारी संस्था आणि प्लॉटधारकांची खोटे दस्तऐवज तयार करून फसवणूक केल्याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिसांनी ६ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी यातील एका आरोपीला ताब्यात घेतले आहे. ही घटना दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास घडली होती.

फसवणूक झालेले माधव उमाजी झुरेकर (वय ३८, रा. इस्लापूर, ता. किनवट, ह. मु. हडको, नांदेड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पुढील ६ आरोपींनी संगनमत करून खोटे दस्तऐवज तयार करून ते खरे असल्याचे भासवले आणि संस्थेसह इतर प्लॉटधारकांची फसवणूक केली.

फसवणूक करणाऱ्या आरोपीतांमध्ये गंगाधर जयराम सोनटक्के, रा. धनेगाव, खातुनबी शेख जफर, रा. धनेगाव, सय्यद महेबूब सय्यद अहेमदसाब, रा. उस्माननगर, अत्तार सुग्राबी सय्यद महेबूब, रा. उस्माननगर, शबनम बेगम मोहम्मद साजीद इरफान, रा. खदबेनगर, इतवारा आणि मोहम्मद साजीद इरफान मोहम्मद युसूफ खान, रा. उमरकॉलनी, नांदेड यांचा सहभाग आहे.

या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ९५५/२०२६ नुसार भा.न्या. सं. कलम ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास पोउपनि भिसे करत आहेत. या प्रकरणात स्वतः पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक



सुरज गुरव यांच्या आदेशावरून पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी अखेर गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी मोहम्मद साजिद इरफान याला ताब्यात घेतले आहे.

# हज यात्रेकरुंसाठी भोजन, निवास, वाहतूक सुविधा वाढवा

## केंद्रीय मंत्री रिजिजू यांच्याकडे खा. रवींद्र चव्हाण यांची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**- दरवर्षी भारतातून पवित्र हज यात्रेसाठी जाणाऱ्या श्रद्धाळूंना ५ दिवसांच्या मुख्य हज कालावधीत भोजन, निवास, वाहतूक आणि मार्गदर्शनासंदर्भात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने याबाबत केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरेन रिजिजू यांच्याकडे योग्य व्यवस्था करण्याची मागणी खासदार रवींद्र चव्हाण यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, हज यात्रेकरूंसाठी पूर्वी उपलब्ध असलेली स्वयंपाकघर सुविधा बंद करण्यात आल्याने भोजनाची समस्या अधिक वाढली आहे. त्यामुळे हज समितीद्वारे यात्रेकरूंकडून घेतल्या जाणाऱ्या हज शुल्कामध्ये भोजन खर्चाचा समावेश करून सर्वांसाठी स्वच्छ आणि वेळेवर भोजनाची व्यवस्था करण्यात यावी किंवा पूर्वीप्रमाणे स्वयंपाकघराची सुविधा पुन्हा सुरू करावी, अशी विनंती करण्यात आली आहे.

अनेक यात्रेकरूंना हज स्थळांपासून सुमारे ५-६ किलोमीटर अंतरावर निवास देण्यात येतो. परंतु तेथून येण्या-जाण्यासाठी पुरेशी वाहतूक सुविधा उपलब्ध नसते. तसेच यात्रेकरूंना मार्गदर्शन आणि समन्वयासाठी पुरेसे सरकारी मार्गदर्शक किंवा समन्वय अधिकारी देखील उपलब्ध नसतात. यामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि प्रथमच हज यात्रा करणाऱ्या श्रद्धाळूंना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. निवेदनाद्वारे केंद्रीय मंत्र्यांना विनंती करण्यात आली आहे की, हज यात्रेकरूंसाठी स्वच्छ भोजनाची व्यवस्था, हज स्थळांजवळ निवास, मोफत वाहतूक सुविधा, प्रशिक्षित मार्गदर्शक/समन्वय अधिकारी यासह इतर आवश्यक सुविधांची योग्य व्यवस्था सुनिश्चित करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने निर्देश द्यावेत. जेणेकरून प्रत्येक हज यात्रेकरू आपली धार्मिक यात्रा सुलभतेने आणि श्रद्धेने पूर्ण करू शकतील.

# नांदेडमध्ये आजपासून राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धा

## २७० खेळाडूंचा सहभाग; सुंदर शेट्टी यांना जीवनगौरव पुरस्कार

**नांदेड (प्रतिनिधी)** -महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या अंतर्गत नांदेड जिल्हा बॅडमिंटन संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन १२ ते १६ ऑगस्ट २०२६ दरम्यान यशवंत कॉलेज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, नांदेड येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून तब्बल २७० खेळाडूंच्या प्रवेशिका प्राप्त झाल्या आहेत.



स्व. शंकरराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त मागील सलग २२ वर्षांपासून नांदेड जिल्हा बॅडमिंटन संघटनेतर्फे ही स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. सलग २२ वर्षे राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करणारी नांदेड जिल्हा बॅडमिंटन संघटना देशातील पहिली जिल्हा संघटना असल्याचा मान संघटनेला मिळाला आहे. स्पर्धेचे उद्घाटन १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वा. होणार असून, अध्यक्षस्थानी जिल्हा बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्ष तथा माजी पालकमंत्री डी. पी. सावंत राहणार आहेत. उद्घाटक म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर उपस्थित राहणार आहेत. यावेळी महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव सिद्धार्थ पाटील, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. भास्कर माने व जिल्हा क्रीडा अधिकारि भैरवनाथ नाईकवाडी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

स्पर्धेत पुरुष व महिला एकेरी, दुहेरी तसेच मिश्र दुहेरी सामने होणार असून, मुख्य पंच म्हणून पुणे येथील पारिजात नातू काम पाहणार आहेत. या उद्घाटन समारंभात महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे माजी सचिव तथा ज्येष्ठ बॅडमिंटन प्रशासक सुंदर शेट्टी यांना नांदेड जिल्हा बॅडमिंटन संघटनेतर्फे 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. शेट्टी यांनी पाच दशकांहून अधिक काळ निस्वार्थपणे बॅडमिंटनच्या विकासासाठी दिलेले योगदान, त्यांची कार्यनिष्ठा व संघटन कौशल्य यामुळे ते क्रीडा क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरले आहेत. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष डी. पी. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे सचिव डॉ. महेश वाकरडकर तसेच पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत आहेत.

# पदवी प्रथम वर्ष प्रवेशाची अंतिम मुदत २० ऑगस्टपर्यंत वाढविली

**नांदेड (प्रतिनिधी)**- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता पदवी प्रथम वर्ष प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना दिलासा देण्यात आला आहे. विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या विनंतीनुसार प्रथम वर्ष प्रवेशाची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६ ऐवजी आता २० ऑगस्ट २०२६ करण्यात आली आहे.

विद्यापीठाने यापूर्वी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी शैक्षणिक वेळापत्रक निश्चित केले होते. त्यानुसार प्रथम वर्ष प्रवेशाची अंतिम तारीख १८ जून २०२६ ते २४ जून २०२६ अशी होती. तसेच मार्च २०२६ मध्ये बारावीची पुरवणी परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्ष प्रवेशासाठी ३१ जुलै २०२६ पर्यंत संधी देण्यात आली होती. मात्र, विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी केलेल्या विनंतीचा विचार करून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी प्रथम वर्ष प्रवेशासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार प्रवेशाची अंतिम तारीख आता २० ऑगस्ट २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे.

याबाबत विद्यापीठाच्या शैक्षणिक नियोजन व विकास विभागाने दि.११ ऑगस्ट २०२६ रोजी शुद्धीपत्रक जारी केले असून, सर्व संबंधितांनी सुधारित मुदतीची नोंद घ्यावी, असे विद्यापीठ प्रशासनाने कळविले आहे. मुदतवाढीमुळे अद्याप पदवी प्रथम वर्षासाठी प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार असून, संबंधित विद्यार्थ्यांनी वाढीव मुदतीचा लाभ घेऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन उपकुलसचिव यांनी केले आहे.

# पक्षाघातग्रस्त प्रमोद देशमुखांच्या मदतीला धावले 'कॅप्टन' दामले!

## निखिल लातूरकर यांच्या पुढाकारातून ५० हजारांची मदत; पाचही मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी घेण्याचे आश्वासन

**नांदेड (प्रतिनिधी)**- संकटाच्या काळात मदतीचा हात पुढे करणे, हीच खरी सामाजिक बांधिलकी मानून परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांनी नांदेड शहरातील सैनिकनगर येथील पक्षाघाताने ग्रस्त प्रमोद देशमुख यांच्या कुटुंबाला ५० हजार रुपयांची आर्थिक मदत केली. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांच्या पुढाकारातून ही मदत देशमुख कुटुंबियांपर्यंत पोहोचली.



प्रमोद देशमुख हे कुटुंबप्रमुख असून, गेल्या काही काळापासून पक्षाघाताच्या आजाराने त्रस्त आहेत. आजारामुळे त्यांची वाचा बंद झाली असून, हात-पायही अधू झाले आहेत. सातत्याने सुरू असलेला औषधोपचार व वैद्यकीय उपचारांचा खर्च, घरचा उदरनिर्वाह आणि पाच मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी अशा अनेक संकटांचा सामना त्यांच्या कुटुंबाला करावा लागत आहे.

देशमुख यांच्या कुटुंबात पत्नी वसुंधरा देशमुख आणि पाच मुली आहेत. कुटुंबाचा प्रमुखच अंथरुणाला खिळल्याने उत्पन्नाचे साधन मर्यादित झाले आहे. उपचारांचा वाढता खर्च आणि मुलींच्या शिक्षणाचा आर्थिक भार यामुळे कुटुंबाची मोठी आर्थिक कोंडी झाली होती. ही परिस्थिती समजल्यानंतर निखिल लातूरकर यांनी देशमुख कुटुंबाची व्यथा कॅप्टन आशिष दामले यांच्यासमोर मांडली.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन कॅप्टन दामले यांनी विलंब न करता ५० हजार रुपयांची मदत उपलब्ध करून दिली. एवढेच नव्हे, तर देशमुख यांच्या पाचही मुलींच्या शिक्षणासाठी आवश्यक ती विशेष शैक्षणिक मदत करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. त्यामुळे संकटाच्या काळात देशमुख कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

**गरजूंना मदतीचा 'दामले पॅटर्न'**

कॅप्टन आशिष दामले यांनी आतापर्यंत नांदेड जिल्ह्यातील विविध गरजू कुटुंबांना स्वतःच्या पदरमोडीतून आर्थिक मदत केली आहे. सौ. सरला शेष यांच्या मुलाच्या पायलट प्रशिक्षणासाठी दोन लाख रुपये, शशिकांत देशमुख यांच्या मुलाच्या वैद्यकीय शिक्षणासाठी एक लाख रुपये, ईशान बावसकर याच्या क्रिकेट प्रशिक्षणासाठी ६० हजार रुपये, संजीवनी नेरकर यांच्या पाल्याच्या उच्च शिक्षणासाठी एक लाख रुपये, राहेर येथील नृसिंह देवस्थानच्या पुस्तकाच्या प्रसारासाठी ५० हजार रुपये, तसेच प्रमोद देशमुख यांच्या उपचारासाठी ५० हजार रुपये, अशी आतापर्यंत एकूण पाच लाख ६० हजार रुपयांची मदत त्यांनी केली आहे.

आजारपणामुळे आर्थिक आणि मानसिकदृष्ट्या खचलेल्या देशमुख कुटुंबासाठी ही मदत केवळ आर्थिक आधार ठरली नाही, तर 'संकटाच्या काळात आपण एकटे नाही', हा विश्वास देणारी ठरली. सामाजिक बांधीलकी जपत गरजूंच्या पाठीशी उभे राहण्याच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

यावेळी निखिल लातूरकर, बाळासाहेब पांडे, राजू जोशी सलगरकर, कृष्णा उमरीकर, सौ. राजश्री उमरीकर, संतोष कुलकर्णी, अनिल डोईफोडे, व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष नरेश दंडवते, गौरव वाळिंबे, शशिकांत पाटील, विश्वजीत चिंचपूरकर, निलेश देशपांडे, केदार देशपांडे, शशिकांत देशमुख, कृष्णा जोशी, शामसुंदर जोशी, प्रमोद बारडकर, राजू जोशी, गिरीश व्यवहारे, प्रशांत मंठाळकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मदतीबद्दल देशमुख कुटुंबीयांनी कॅप्टन आशिष दामले आणि प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# सबज्युनियर व ज्युनियर जिल्हास्तरीय वुशू स्पर्धेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** - २३ व्या महाराष्ट्र राज्य सबज्युनियर (मुले-मुली) वुशू अजिंक्यपद स्पर्धा व २४ वी महाराष्ट्र राज्य ज्युनियर (मुले-मुली) वुशू अजिंक्यपद स्पर्धा २०२६ पुणे जिल्ह्यात आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी ऑल नांदेड डिस्ट्रीक्ट वुशू असोसिएशनद्वारे जिल्हास्तरीय वुशु स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून त्यातून जिल्हा संघ निवडला जाणार आहे.

या स्पर्धेत सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या वुशू खेळाडुंनी दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नवनिकेतन प्राथमिक शाळा, पावडेवाडी नाका नांदेड येथे उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा वुशू संघटनेचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य, सचिव डॉ. राजेश जांभळे, सहसचिव तथा मुख्य प्रशिक्षक डॉ. प्रमोद वाघमारे आदींनी केले आहे.

# सांगवी प्रभागामध्ये सीबीएसई शाळेची मान्यता

## नगरसेविका सौ. मिनल पाटील यांच्या मागणीला यश

**नांदेड (प्रतिनिधी)** -शहरातील सांगवी प्रभाग क्रमांक ३ मध्ये महानगरपालिकेच्यावतीने चालविली जाणारी सीबीएसई शाळा सुरू करण्याची आग्रही मागणी करणाऱ्या नगरसेविका मिनल गजानन पाटील यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. नांदेड मनपाच्या वतीने घोषित करण्यात आलेल्या वार्षिक अंदाजपत्रकात शाळेच्या उभारणीला मान्यता देत मोठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

यामुळे या परिसरातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्याची फार मोठी संधी उपलब्ध होणार आहे. प्रभाग क्रमांक ३ मधील सांगवी परिसरातील नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडविण्यासाठी महापालिका प्रशासनाशी सातत्याने समन्वय साधत विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न शिवसेनेच्या नगरसेविका मिनल गजानन पाटील यांनी सुरू ठेवला आहे. शिक्षण, आरोग्य आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा या विषयांना प्राधान्य देत त्यांनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेत त्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू केले आहेत.



महापालिकेच्या पार पडलेल्या मागील दोन्ही सर्वसाधारण सभेमध्ये मिनल पाटील यांनी सांगवी परिसरामध्ये सीबीएससी शाळेची गरज अधोरेखित केली होती. त्याला अनुसरून महापालिकेने या भागात शहरातील व मराठवाड्यातील कोणत्याही महानगरपालिकेकडून चालविली जाणारी पहिली सीबीएससी शाळा कार्यान्वित करण्याचे ठरविले आहे, सांगवी येथील मनपाच्या मालकीच्या जागेत सदरील शाळा उभारली जाणार आहे.

# नांदेड विभागाकडून २७ गाड्यांची तिकीट तपासणी; ३.२४ लाखांचा महसूल

**नांदेड (प्रतिनिधी)** -दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने दि. १० ऑगस्ट रोजी पहाटे ४:३० ते रात्री ८ या कालावधीत सर्व तिकीट तपासणी पथकांच्या सक्रिय सहभागातून मोठी तिकिट तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेवर विभागीय वाणिज्य व्यवस्थापक बी. रितेश यांनी देखरेख ठेवली.

या विशेष तपासणी मोहिमेत आरपीएफचे ३ कर्मचारी तसेच वाणिज्य विभागाचे असे एकूण ३१ कर्मचारी सहभागी झाले होते. प्रवाशांनी रेल्वे प्रवास नियमांचे पालन करावे आणि प्रामाणिक प्रवाशांना



आरामदायी प्रवासाची सुविधा मिळावी यासाठी २७ गाड्यांची सखोल तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान तिकीटविना प्रवास -३१५ प्रकरणे, अनियमित प्रवास - ४४ प्रकरणे, अनबुक्ड सामान - २०६ प्रकरणे असे ५६५ प्रकरणे उघडकीस आले. या संपूर्ण कारवाईतून रेल्वे प्रशासनाने एकूण ३ लाख २४ हजार ३२० रुपये इतका महसूल वसूल केला. ही मोहीम तिकीटविना व अनियमित प्रवासाला आळा घालणे, रेल्वे महसुलाचे संरक्षण करणे आणि प्रामाणिक प्रवाशांना सुरक्षित, सुलभ व आरामदायी प्रवास उपलब्ध करून देण्याच्या नांदेड विभागाच्या सातत्यपूर्ण बांधिलकीचे द्योतक आहे. प्रवाशांनी वैध तिकिटासहच प्रवास करावा व रेल्वे नियमांचे पालन करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# श्रीपतराव टिप्परसे यांचे निधन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** - कृषी उद्योग खत कारखान्यातील सेवानिवृत्त कर्मचारी श्रीपतराव गोविंदराव टिप्परसे यांचे मंगळवार, दि. ११ ऑगस्ट रोजी सायंकाळी निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता तुप्पा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते देवराव टिप्परसे तुप्पेकर यांचे ते काका होत.

# स्वस्त धान्य दुकानदारांचे ६ महिन्यांचे कमिशन रखडले

## थकीत रक्कम तत्काळ खात्यावर जमा करण्याची मागणी

**हदगाव (प्रतिनिधी)** - तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांचे जानेवारी ते जून या सहा महिन्यांचे कमिशन अद्याप त्यांच्या खात्यावर जमा झाले नसल्याने स्वस्त धान्य दुकानदार असोसिएशनच्या वतीने अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना निवेदन देण्यात आले आहे. थकीत कमिशनची रक्कम तातडीने दुकानदारांच्या खात्यावर जमा करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार शासनाच्या नियमानुसार स्वस्त धान्य दुकानदारांनी लाभार्थ्यांना धान्य वाटपाचे काम नियमितपणे केले आहे. मात्र, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे व जून या सहा



महिन्यांचे कमिशन अद्याप मिळालेले नाही. त्यामुळे दुकानदारांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या असून, शासनाने तातडीने प्रलंबित कमिशन अदा करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच सन २०२१ पासून नियमित धान्य पैसे भरण्याबाबत शासनस्तरावर निर्णय झालेला असतानाही संबंधित रकमेबाबत अडचणी असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या अभिप्रायानुसार स्वस्त धान्य दुकानदारांना प्रति क्विंटल दहा रुपये वाढ जाहीर करण्यात आली असून, त्यानुसार राज्य शासनाने दुकानदारांना प्रतिक्विंटल तीन रुपये वाढ करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

हदगाव तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांच्या प्रलंबित प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन सहा महिन्यांचे थकीत कमिशन तत्काळ खात्यावर जमा करावे व इतर प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदनावर असोसिएशनचे अध्यक्ष संपतराव काकडे पाटील, उपाध्यक्ष जयप्रकाश देशमुख व सचिव मिलिंद खंदारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com